पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक १७ ● गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

डोक शांत असेल तर
निर्णय चुकत नाही,
भाषा गोड असेल तर
माणसं तुटत नाहीत.

सिटी न्यूज सुपरफास्ट
तेल्हारा शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
कृष्णा विखे
शहर प्रतिनिधी
+91 7262838288

## »थोडक्यात

### चिमुकलीला बिबट्याने पळविले!

पुणे : पुण्यातील शिरूर तालुक्यातील पूर्व भागात असलेल्या पिंपळसुटी गावात बुधवारी पहाटे एका पाच वर्षांच्या चिमुकलीचा बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. भाग्यश्री संदीप वारे (वय ५ वर्षे) असे मृत बालिकेचे नाव आहे. भाग्यश्री ही आपल्या आई-वडिलांसह ऊसतोडीच्या कामासाठी पिंपळसुटी येथे वास्तव्यास होती. हे कुटुंब शेतातील गोठ्याजवळ झोपलेले असताना, पहाटे पावणेतीनच्या सुमारास बिबट्याने अचानक या चिमुकलीवर हल्ला केला. मुलीच्या किंचाळण्याचा आवाज ऐकून आई-वडील तात्काळ जागे झाले. मात्र, तोपर्यंत बिबट्याने तिला उसाच्या शेतात ओढून नेले होते.

### पश्चिमेकडील वाऱ्याचा वेग वाढला!

मुंबई : राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे. बंगालच्या उपसागरावर चक्राकार वाऱ्यांच्या सक्रियतेमुळे कोकण मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रासह मराठवाडा, विदर्भातही अनेक भागात जोरदार पावसाने हजेरी लावली. मुंबईसह उपनगरात पावसाचा जोर वाढला आहे. पश्चिमेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांची तीव्रता अधिक झाल्यामुळे राज्यात सर्वदूर पाऊस होत आहे. पूर्व विदर्भासह मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पुढील २४ तासांत राज्यभरात पावसाचा जोर वाढणार असून हवामान विभागाने राज्यभर पावसाचे विविध अलर्ट जारी केले आहेत.

### उपोषणावरती सोनम वांगचुक अद्यापही ठाम!

नवी दिल्ली : सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज २६ वा दिवस आहे. ते गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयात आहेत. तर सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडण्याची सशर्त तयारी दर्शवली आहे. सरकारला पत्र लिहून त्यांनी आपल्या मागण्या सादर केल्या आहेत. तर आंदोलनकर्त्यांवर दंड ठोठावणार नाही अशी हमी द्या, सरकारने हमी दिली तर उपोषण थांबवतो असं वांगचुक म्हणालेत.




## तोडफोड अन् राड्याने शहर हादरले !

प्रतिनिधी २३ जुलै

अकोला: नीट च्या पेपर लिक प्रकरणात केंद्रिय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. त्याच बरोबर दिल्लीतील जंतर मंतर येथे झालेल्या लाठीमार प्रकरणाचा निषेध म्हणून आज वंचितने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. केंद्र व राज्य सरकारच्या हुकूमशाही धोरणांविरोधात वंचित बहुजन आघाडीसह महाविकास आघाडी आणि इतर विरोधी संघटनांनी पुकारलेल्या 'महाराष्ट्र बंद'ला अकोल्यात उत्स्फूर्त, पण अत्यंत तणावपूर्ण प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच शहरात बंदचा मोठा इम्पॅक्ट पाहायला मिळाला; मात्र दिवसभरात आंदोलक-व्यापाऱ्यांमधील वादावादी आणि तोडफोडीच्या घटनांमुळे या बंदला हिंसक गालबोट लागले. शाळा व महाविद्यालय तसेच कोचिंग क्लास हे देखील बंद होते. काही शाळा महाविद्यालय मात्र सुरु होते. सकाळच्या सत्रातच वंचितच्या कार्यकर्त्यांनी सर्किट हाऊस निघत गांधी रोड, टिळक रोड, बाजारपेठ, जठारपेठ रोड, जवाहर नगर, मार्गे पुन्हा सर्किट हाऊस अशी भव्य रॅली काढली. या आंदोलनात महिला व युवतींचा मोठा सहभाग दिसून आला. 'ये सरकार निकम्मी है' च्या घोषणांनी शहर दुमदुमले. बंदच्या धसक्याने शाळा-महाविद्यालयांनी सकाळीच विद्यार्थ्यांना घरी सोडले, तर काही ठिकाणी वर्गात शुकशुकाट होता. महापालिकेच्या दारावर शिवसैनिकांनी आक्रमक भूमिका घेत सरकारचा धिंडवडा काढला. सकाळच्या सुमारास बंदला हिंसक गालबोट लागले. न्यू क्लॉथ मार्केटमध्ये दुकाने बंद करण्यावरून आंदोलक आणि व्यापाऱ्यांमध्ये तुफान वादावादी झाली. पोलिसांनी मध्यस्थी करत वाद मिटवला; मात्र काही वेळातच दाना बाजारात उपद्रवींनी दुकानांची थेट तोडफोड केली. या तोडफोडीमुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण व्यापारी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. दाना बाजारातील तोडफोडीनंतर व्यापारी आक्रमक झाले. शहरभर कडक बंदोबस्त आणि छावणीचे स्वरूप आले असताना, 'तोडफोड होत असताना पोलीस नेमके कुठे होते?' असा संतप्त सवाल व्यापाऱ्यांनी विचारला आहे. उपद्रवींवर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. अकोल्यात बंदच्या हाकेला अकोलेकरांनी व्यापक पाठिंबा दिला असला, तरी व्यापाऱ्यांशी झालेली बाचाबाची, तोडफोड आणि झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे आजचा दिवस अकोल्यासाठी अत्यंत गदारोळाचा ठरला. शहराबरोबर जिल्ह्यात बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात केला गेला होता. दरम्यान दुपारी १.३० वाजेच्या सुमारास वंचितच्या कार्यकर्त्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली होती.

### बाजारपेठ ठप्प

अकोला शहर ही बाजारपेठेने ओळखली जाते. बंद मुळे कोट्यावधीचे व्यवहार ठप्प पडले. दाना बाजार,किराणा बाजार, कपडा बाजार येथील दूकाने बंद असल्याने सर्व व्यवहार ठप्प पडले. इतकेच नाही तर हमाल, मालवाहतुक करणारे चालक यांचा रोजगार आज बुडाला. एकूण अकोल्यात सराफा आणि इतर बाजारपेठ बंद झाल्याने कोट्यवधीची बाजारपेठ ठप्प पडल्याचे चित्र शहरात होते. दूपारनंतर व्यापारपेठ थोडीबहूत सुरळीत झाली होती.

## राड्यानंतर आयजी अकोल्यात दाखल




प्रतिनिधी २३ जुलै

अकोला :शहरातील 'महाराष्ट्र बंद' दरम्यान दाना बाजारात झालेली तोडफोड आणि व्यापाऱ्यांमधील संतापाच्या पार्श्वभूमीवर अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील तातडीने अकोल्यात दाखल झाले आहेत. शहरातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था पूर्ववत करण्यासाठी आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी त्यांनी स्वतः अकोल्यात ठाण मांडले आहे. बंददरम्यान अकोल्यातील न्यू क्लॉथ मार्केट आणि दाना बाजारात झालेल्या गोंधळ आणि तोडफोडीच्या घटनेनंतर पोलीस प्रशासन पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील हे तातडीने अकोला शहरात दाखल झाले आहेत. अकोल्यात पोहोचताच आयजी डॉ. महेश पाटील यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. शहरात कुठेही पुन्हा अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी त्यांनी कडक सूचना दिल्या आहेत.



## विद्यार्थ्याला धमकी देणाऱ्या पोलिसाची बदली





प्रतिनिधी २३ जुलै

मुंबई: नीट पेपर फुटीविरोधात मुंबईतील विविध भागांमध्ये विद्यार्थ्यांकडून आंदोलने केली जात आहेत. या आंदोलनादरम्यान ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुंबई पोलिसांच्या गाडीतच अंमली पदार्थांच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा एक अत्यंत धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. या व्हिडिओची गांभीर्याने दखल घेत मुंबई पोलिसांनी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. एक पोलीस तरुणाला धमकावताना दिसताना व्हिडीओमध्ये दिसतो. पुन्हा दिसलास तर ५० ग्रॅमची पावडर टाकेन अशी धमकी देतोय. विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांची धमकी देऊन कारवाई करण्याची भिती घालणारा तो कॉन्स्टेबल मुंबई पोलिसांच्या सायन पोलिस ठाण्यात कार्यरत आहे. तो व्हिडिओ बुधवारचा असून त्या चालकाची तात्काळ बदली करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीचे आदेश वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेले आहेत. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी देखील सोशल मीडियावरती पोस्ट करत संताप व्यक्त केला आहे.

## आज मी जंतर-मंतरवर दिसलो नाही तर.. : अभिजीत दिपके

वृत्तसंस्था २३ जुलै

नवी दिल्ली : गेल्या अनेक दिवसांपासून दिल्लीच्या जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आणि विविध प्रश्नांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला नेतृत्व देणारे कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांची प्रकृती खालावली आहे. गेल्या काही दिवसांपासून तीव्र तापाने फणफणलेले असतानाही पेनकिलर गोळ्या घेऊन आंदोलनात सक्रिय असलेल्या दीपके यांनी आज आंदोलकांना एक भावूक आवाहन केले आहे. 'आज मी जंतर-मंतरवर दिसलो नाही तर मला माफ करा,' अशी पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर केली आहे. अभिजीत दिपके यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर लिहिले की, 'मला गेल्या काही दिवसांपासून ताप आणि अंगदुखीचा त्रास होत आहे.



आतापर्यंत मी पेनकिलर गोळ्या घेऊन काम चालवत होतो. परंतु, आज मी जंतर-मंतरवर दिसलो नाही तर मला माफ करा. पूर्णपणे ठीक होण्यासाठी मला काही तासांच्या विश्रांतीची अत्यंत गरज आहे. काळजी करू नका, संध्याकाळपर्यंत मी पुन्हा विरोध-प्रदर्शन होणाऱ्या ठिकाणी परत येईन,' असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान,२० जूनपासून अमेरिकेतून दिल्लीत परतल्यापासून अभिजीत दीपके सातत्याने जंतर-मंतरवर ठिय्या मांडून आहेत. अहोरात्र चालणारे आंदोलन, नेत्यांच्या भेटीगाठी, गर्दी, प्रचंड गोंधळ आणि टीम मॅनेजमेंटमुळे त्यांना जराही विश्रांती मिळालेली नाही. सततच्या धावपळीमुळेच त्यांची प्रकृती बिघडल्याचे सांगण्यात येत आहे.

### 'इंटरनेट' बंद केल्याचा आरोप

एकीकडे पक्षाचे प्रमुख आजारी असताना दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टीने प्रशासनावर अत्यंत गंभीर आरोप केला आहे. जंतर-मंतर परिसरात प्रशासनाकडून इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे. सरकार आंदोलनकारांना पुन्हा एकदा कोणतीतरी मोठी पोलिसी कारवाई करण्याची तयारी तर करत नाही ना? असा संशय पक्षाने उपस्थित केला आहे. मात्र, या इंटरनेट बंदीच्या आरोपांवर अद्याप सरकार किंवा पोलिसांकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण आलेले नाही.

## पुण्यात वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा!

### हजारोंच्या संख्येने विद्यार्थी झाले सहभागी

प्रतिनिधी २३ जुलै

पुणे : दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर पुण्यात मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले आहेत. आंदोलनाची सुरुवात सकाळी १० वाजता डेक्कन येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली आहे. लक्ष्मी रस्ता, भवानी पेठ मार्गे मोर्चा काढण्यात येऊन पुणे रेल्वेस्थानकाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर समारोप होणार आहे. पुणे शहरातही बंद पाळण्याचे आवाहन वंचितने केले होते. पालकांनी आपल्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयात पाठवू नये, असेही सांगण्यात आले होते. या बंदला आतापर्यंत ३० हून अधिक संघटनांनी पाठिंबा दर्शविल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे पुणे शहराध्यक्ष ॲड. अरविंद तायडे आणि युवक आघाडीचे शहराध्यक्ष सागर आल्हाट यांनी दिली आहे. या बंदमध्ये विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटना, व्यापारी वर्ग तसेच समविचारी राजकीय पक्षांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, ही आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. वंचित बहुजन आघाडीचे भिडे वाड्यापासून मोर्चा जात असताना शिवाजी छत्रपती शिवाजी रस्त्यावर दुकान बंद करण्याचे आवाहन आंदोलनाकडून करण्यात येत आहे. भारताचे झेंडे घेऊन हजारो विद्यार्थी, नागरिक जंतर-मंतर वरील विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ या मोर्चामध्ये सहभागी झाले आहेत.

## एखाद्या मंत्र्याच्या राजीनाम्याने सरकारची सत्ता जाणार नाही!

### अण्णा हजारेंचे पीएम मोदींना पत्र, दिल्लीसह विविध शहरात विद्यार्थ्यांचे आंदोलन

प्रतिनिधी २३ जुलै





अहिल्यानगर : नवी दिल्लीसह देशातील विविध शहरांमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. 'लोकशाहीत जनतेचा आवाज दडपून नव्हे, तर संवादातून प्रश्न सोडविण्याबाबत' असा या पत्राचा विषय असून, आंदोलनादरम्यान घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अण्णा हजारेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारच्या घटना घडणे कोणत्याही हिताचे नाही. कोणत्याही परिस्थितीत हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा अनावश्यक बळाचा वापर टाळला गेला पाहिजे. आज देशातील लाखो तरुण पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, बेरोजगारी आणि इतर अनेक प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता, ती समाजातील वेदना आणि अपेक्षा म्हणून समजून घेणे आवश्यक आहे. सरकारी कारभारामध्ये काही गैरकारभार उघडकीस आला की त्याची जबाबदारी खालच्या माणसांवर टाकायची आणि चांगलं जे असेल त्याचे श्रेय सरकारने घ्यायचं हे योग्य नाही. वरिष्ठांची जनतेप्रती जबाबदारी व उत्तरदायित्व आहे,' असे त्यांनी म्हटले आहे. अण्णा हजारे यांनी पुढे म्हटले आहे की, 'विद्यार्थी व पालक मागील २५ दिवसांपासून रस्त्यावर शांततेच्या मार्गावर आंदोलन करत मंत्र्यांच्या राजीनामा मागत आहे. उत्तरदायित्व म्हणून एखाद्या मंत्र्याचा राजीनामा घेतल्याने सरकारची सत्ता जाणार नाही उलट इतर मंत्र्यांना संदेश जाईल की खात्याचा कारभार नीट केला नाही तर पदावरून दूर केले जाईल. यामुळे उलट सरकारचा कारभार अधिक चांगला होईल.'

### हजारेंचे आज अहिल्यानगरमध्ये मौन आंदोलन

दरम्यान, दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आज अहिल्यानगरमध्ये मौन आंदोलन करणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरच्या वाडिया पार्क येथील महात्मा गांधी स्मारक परिसरात तयारी करण्यात आली. या आंदोलन स्थळाला प्रतीकात्मक 'नगरचे जंतर-मंतर' असे नामकरण करण्यात आले आहे.

### आंदोलन करणारेही आपल्या देशाचेच नागरिक

लोकशाहीमध्ये संवाद हा संघर्षापेक्षा नेहमीच श्रेष्ठ मार्ग असतो. म्हणून आपणास नम्र विनंती आहे की, जनतेच्या आवाजाकडे विरोधकांचा आवाज म्हणून पाहू नये. आंदोलन करणारेही आपल्या देशाचेच नागरिक आहेत. त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून, विश्वासाचे वातावरण निर्माण करून आणि सकारात्मक चर्चेद्वारे मार्ग काढणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

## विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ ठाकरे बंधू मैदानात!

प्रतिनिधी २३ जुलै



मुंबई : नीट परीक्षेत झालेल्या पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने राजधानी दिल्लीत सुरू केलेले आंदोलन आता तीव्र झालं आहे. तसेच या आंदोलनाला सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातूनही मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. आता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या ठाकरे बंधूंनीही या विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ एल्गार पुकारला आहे. तसेच रविवारी २६ जुलै रोजी मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क येथून प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिरपर्यंत विद्यार्थ्यांसह मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. आज राज ठाकरेंचे निवासस्थान असलेल्या शिवतीर्थ येथे आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी या मोर्चाची घोषणा केली आहे. या मोर्चाची माहिती देताना राज ठाकरे यांनी सांगितले की,सध्या विद्यार्थी आणि सर्वसामान्य लोक आपला राग, रोष व्यक्त करताहेत आणि तो केंद्र सरकारला कळणं गरजेचं आहे. म्हणून आम्ही २६ जुलै रोजी मोर्चा काढणार आहोत. हा मोर्चा शिवाजी पार्क येथून निघेल आणि सिद्धिविनायक मंदिर येथे समाप्त होईल. तिथे जाऊन आम्ही या सरकारला सुबुद्धी देवो, असं साकडं सिद्धिविनायकाला घालणार आहे. तर उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे मोर्चाबाबत म्हणाले की, कालच दिल्लीला जाऊन आलो. माझ्या आधी अमित पण जाऊन आला. आपल्या माध्यमातून ही दृश्य संपूर्ण जग पाहतंय. एक गोष्ट नक्की आहे की हा विषय केवळ 'नीट'च्या परीक्षेपुरता मर्यादित नाही आहे. आंदोलनात एक मध्यमवयीन तरुण होता. त्यावेळी त्याला तुम्ही इथे का आलात असे विचारले असता त्याने नोटाबंदीमध्ये आपला व्यवसाय पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे आणि त्याचा राग व्यक्त करण्यासाठी आपण इथे आल्याचे सांगितले. म्हणजेच विद्यार्थ्यांचे आंदोलन हे केवळ निमित्त आहे.

## आषाढी एकादशी

आषाढी एकादशी (देवशयनी एकादशी) हा वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा आणि पवित्र सण आहे. जो आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षात साजरा केला जातो. या दिवशी भगवान विष्णू योगनिद्रेत जातात आणि चातुर्मासाला सुरुवात होते. या दिवशी लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरला पोहोचतात आणि विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतात. आषाढी एकादशी २५ जुलै रोजी येत आहे. एकादशी तिथी २४ जुलै रोजी सकाळी ९:१३ वाजता सुरू होऊन २५ जुलै रोजी सकाळी ११:३४ वाजता समाप्त होईल. पारण वेळ (उपवास सोडण्याची वेळ): व्रताचे पारण २६ जुलै रोजी सकाळी ५:५८ ते ८:३६ या वेळेत करणे शुभ मानले जाते. पंढरपूर वारी: महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज आदींच्या पालख्या 'ज्ञानोबा-तुकाराम' असा गजर करत पंढरपुरात दाखल होतात. धार्मिक महत्त्व: या दिवशी उपवास करून विठ्ठलाची पूजा केल्याने वर्षभरातील सर्व एकादश्यांचे पुण्य लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.तुम्हाला आषाढी एकादशीच्या व्रताची पद्धत हवी आहे की पंढरपूर वारीचे वेळापत्रक जाणून घ्यायचे आहे?

# भारतीय रेडिओच्या प्रसारणाला शतकाचा इतिहास!

## आज राष्ट्रीय प्रसारण दिन



आजच्या घडीला करमणूक, संगीत ऐकणे, चित्रपट पाहणे व बातम्या वाचणे हे आता बोटांच्या इशाऱ्यांवर शक्य झाले आहे. पण, भारताच्या आधुनिक इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात अशा प्रकारच्या सुविधा सर्व भारतीय नागरिकांपर्यंत पोहोचलेल्या नव्हत्या. त्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असली तरी पायाभूत सुविधांची वानवा हे त्यातले एक मोठे कारण होते. १०० वर्षांपूर्वी या क्षेत्रात मैलाचा दगड रचण्यात आला. ब्रिटिश काळात १०० वर्षांपूर्वी पहिले रेडिओ प्रसारण करण्यात आले.

भारतात दरवर्षी २३ जुलै रोजी राष्ट्रीय प्रसारण दिन साजरा केला जातो. देशातील पहिल्या रेडिओ प्रसारणाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. २३ जुलै १९२७ रोजी 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी'ने मुंबई स्टेशनवरून देशातील पहिले अधिकृत रेडिओ प्रसारण सुरू केले होते.

२३ जुलै १९२७ रोजी खाजगी मालकीच्या 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी' ने भारतात पहिल्यांदाच रेडिओ प्रक्षेपणाची सुरुवात केली. ऑल इंडिया रेडिओ (आकाशवाणी) १ एप्रिल १९३० रोजी सरकारने हे प्रसारण आपल्या ताब्यात घेतले आणि त्याचे नाव 'भारतीय राज्य प्रसारण सेवा' ठेवले. पुढे ८ जून १९३६ रोजी याचे नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' असे करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर, १९५६ मध्ये ऑल इंडिया रेडिओसाठी 'आकाशवाणी' हे अधिकृत नाव स्वीकारण्यात आले. रेडिओ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून माहिती, शिक्षण आणि संस्कृतीचा प्रसार करण्याचे एक शक्तिशाली माध्यम राहिले आहे. दुर्गम भागापर्यंत बातम्या पोहोचवण्यात आणि राष्ट्रीय एकात्मता जपण्यात रेडिओचे मोठे योगदान आहे. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्यानुसार आकाशवाणी आजही कार्यरत आहे.

बातम्यांचे आणि मनोरंजनाचे एक सोपे माध्यम म्हणून भारतीयांच्या आयुष्यात रेडिओचे असलेले महत्त्व साजरे करण्यासाठी दरवर्षी २३ जुलै रोजी राष्ट्रीय प्रसारण दिन आयोजित केला जातो. १९२७ साली याच दिवशी, देशातील सर्वप्रथम प्रथम रेडिओ प्रसारण बॉम्बे स्टेशनवरून भारतीय प्रसारण कंपनी मार्फत करण्यात आले.

यामुळे हा दिवस 'प्रसारण दिन' म्हणून साजरा केला जातो. १ एप्रिल १९३० रोजी सरकारने ही खासगी प्रसारण कंपनी ताब्यात घेऊन त्याचे नामकरण भारतीय राज्य प्रसारण सेवा (आयएसबीएस) असे केले.

इंग्रज सरकारने बी.बी.सी.च्या धर्तीवर भारतात 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन' स्थापना करून २३ जुलै १९२७ रोजी पहिल्यांदा मुंबई आणि कोलकता येथे आकाशवाणीचे प्रसारण सुरू झाले. जेव्हा १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा 'ऑल इंडिया रेडिओ' नावाचा स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली. 'ऑल इंडिया रेडिओ'चे अधिकृतरीत्या १९३६ साली 'आकाशवाणी' हे नाव ठरविण्यात आले होते.

### तब्बल २७ भाषांमध्ये प्रसारण

भारताबाहेरील देशांसाठीचा आकाशवाणीचा सेवा विभाग एकंदर २७ भाषांमध्ये प्रसारण करतो. हे प्रसारण मुख्यतः लघुतरंगांच्या माध्यमातून बाहेरील देशांमध्ये केले जाते. 'सामान्य बाह्य प्रसारण सेवा' ही इंग्रजीमध्ये ८ तास सेवा देणारी प्रमुख सेवा आहे.

..........

### रेडिओनं केलं जनजागृतीचं काम

रेडिओ हे सर्वात जुने, सर्वाधिक लोकप्रिय माध्यमांपैकी एक राहिले आहे. स्वातंत्र्यापूर्वी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद रेडिओ आणि काँग्रेस रेडिओनं भारतीयांना ब्रिटिशांविरुद्ध जागृत करण्याचे काम केले होते. रेडिओ प्रसारणानं स्वतंत्र भारताच्या उभारणीत उत्तम योगदान दिलंय. नैसर्गिक आपत्तींच्या काळात माहिती पुरवण्यातही प्रसारण महत्त्वाची भूमिका बजावते. रेडिओ आणि टेलिव्हिजननं भारतातील विविधतेची फक्त माहिती दिली नाही तर जनतेला योग्य माहिती देऊन जागृत करण्याचं देखील काम केलं आहे. आजही काही गावांमध्ये शेतकरी रेडिओ घेऊन शेतात जातो आणि शेतीमधील काम करताना दिसतो. आता डिजिटल युगाची सुरुवात झाली असल्यामुळं रेडिओ कमी प्रमाणात ऐकला जातो.

--------------

### राष्ट्रीय प्रसारण दिनाचा इतिहास

१९२६ मध्ये 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी' ह्या एका खाजगी कंपनीने भारत सरकारशी एक करार करून मुंबई आणि कलकत्ता येथे अनुक्रमे २३ जुलै आणि २६ ऑगस्ट १९२७ रोजी दोन रेडिओ-केंद्रे सुरू केली. या केंद्रांची कार्यक्रम ४८ किमी. च्या परिसरातच ऐकू येण्याची व्यवस्था होती. या सुमारास देशात १००० रेडिओ-परवाने होते. १९२७ च्याही अगोदर भारतात नभोवाणीचा प्रसार खाजगी हौशी क्लबांद्वारा झालेला होता. १९२४ मध्ये मद्रास येथे पहिला रेडिओ-क्लब स्थापन झाला. हौशी रेडिओ-क्लब लाहोर, अलाहाबाद, पेशावर, आणि डेहराडून येथे चालविले जात होते. सरकारने भावी काळात स्थापिलेल्या रेडिओ-केंद्रांचे हे रेडिओ-क्लब अग्रदूत ठरले. म्हैसूर, बडोदा, त्रिवेंद्रम, हैदराबाद आणि औरंगाबाद ह्या पाचही ठिकाणी नभोवाणी-कार्य चालू होते. म्हैसूर संस्थानाने १९३५ मध्ये स्थापिलेल्या रेडिओ-केंद्रास 'आकाशवाणी' हे नाव दिले होते. हेच नाव पुढे भारत सरकारने देशातील सर्व रेडिओ-केंद्रांसाठी स्वीकारले.

# हिपॅटायटीस बी यकृताचा एक गंभीर संसर्ग!

हिपॅटायटीस बी हा हिपॅटायटीस बी विषाणूमुळे होणारा यकृताचा एक गंभीर संसर्ग आहे. या संसर्गामुळे तीव्र आणि दीर्घकालीन असे दोन्ही प्रकारचे यकृताचे आजार होऊ शकतात.

तीव्र हिपॅटायटीस बी संसर्ग हा एक अल्पकालीन आजार आहे, जो विषाणूच्या संपर्कात आल्यानंतर पहिल्या ६ महिन्यांत होतो. दीर्घकालीन हिपॅटायटीस बी संसर्ग हा एक दीर्घकाळ चालणारा आजार आहे.

जो विषाणू व्यक्तीच्या शरीरात राहिल्यामुळे होतो. दीर्घकालीन हिपॅटायटीस बी मुळे कालांतराने यकृताचे नुकसान, सिरोसिस, यकृत निकामी होणे आणि यकृताचा कर्करोग यांसारख्या गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात

### हिपॅटायटीस बी संसर्ग किती प्रमाणात आढळतो?

हिपॅटायटीस बी ही एक जागतिक आरोग्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार २०१९ मध्ये जगभरात अंदाजे २९६ दशलक्ष लोक दीर्घकालीन हिपॅटायटीस बी संसर्गाने ग्रस्त होते. भारतात, अंदाजे ४० दशलक्ष लोक एचबीव्ही ने दीर्घकाळ संक्रमित आहेत. ही आकडेवारी हिपॅटायटीस बी विषयी जागरूकता, प्रतिबंध आणि वेळेवर उपचार यांचे महत्त्व अधोरेखित करते .

### हिपॅटायटीस बी ची कारणे

हिपॅटायटीस बी हा हिपॅटायटीस बी विषाणूमुळे होतो. या विषाणूचा प्रसार संसर्गजन्य रक्त, वीर्य आणि इतर शारीरिक द्रव्यांच्या संपर्कातून होतो. संक्रमित जोडीदारासोबत असुरक्षित लैंगिक संबंध ठेवल्यास आणि त्यांचे रक्त, लाळ, वीर्य किंवा योनीतील स्राव तुमच्या शरीरात गेल्यास तुम्हाला हिपॅटायटीस बी होऊ शकतो . संसर्गित रक्ताने दूषित झालेल्या सुया आणि सिरिंजमधून एचबीव्ही सहज पसरतो. हिपॅटायटीस बी हा आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी आणि मानवी रक्ताच्या संपर्कात येणाऱ्या इतर कोणासाठीही चिंतेचा विषय आहे. एचबीव्ही संसर्ग झालेल्या गर्भवती महिला प्रसूतीदरम्यान हा विषाणू त्यांच्या बाळाला देऊ शकतात. तथापि, बहुतेक प्रकरणांमध्ये, नवजात बाळाला संसर्ग टाळण्यासाठी लसीकरण केले जाऊ शकते.

### हिपॅटायटीससाठी जोखीम घटक

हिपॅटायटीस बी च्या जोखमीच्या घटकांमध्ये अनेक जोडीदारांसोबत किंवा संक्रमित व्यक्तीसोबत असुरक्षित लैंगिक संबंध, सुयांची देवाणघेवाण, दीर्घकालीन एचबीव्ही असलेल्या व्यक्तीसोबत राहणे, संक्रमित आईच्या पोटी जन्म घेणे, आरोग्यसेवेच्या संपर्कात येणे, डायलिसिस आणि उच्च-जोखमीच्या प्रदेशात प्रवास करणे यांचा समावेश होतो.

### हिपॅटायटीस बी संसर्गाची लक्षणे

हिपॅटायटीस बी असलेल्या अनेक लोकांना, विशेषतः सुरुवातीच्या टप्प्यात, कोणतीही लक्षणे जाणवत नाहीत. तथापि, काही लोकांमध्ये सौम्य ते गंभीर स्वरूपाची लक्षणे विकसित होऊ शकतात. सामान्य लक्षणांमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे. पोटदुखी, गडद लघवी, ताप,सांधेदुखी, भूक न लागणे, मळमळ आणि उलट्या, अशक्तपणा आणि थकवा, तुमची त्वचा आणि डोळ्यांचा पांढरा भाग पिवळा पडणे (कावीळ). संसर्गानंतर १ ते ४ महिन्यांत लक्षणे दिसू शकतात, परंतु ती विकसित होण्यासाठी ६ महिन्यांपर्यंतचा कालावधी देखील लागू शकतो. तीव्र लक्षणे अनेक आठवड्यांपर्यंत टिकू शकतात.

### आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात

यकृतावर व्रण पडणे (सिरोसिस), यकृत निकामी होणे, यकृताचा कर्करोग, मूत्रपिंडाचे आजार.

### हिपॅटायटीस बी चे प्रकार

हिपॅटायटीस बी चे तीन मुख्य प्रकार आहेत: तीव्र, दीर्घकालीन आणि वाहक. तीव्र हिपॅटायटीस बी हा विषाणूच्या संपर्कात आल्यानंतर पहिल्या सहा महिन्यांत होणारा एक अल्पकालीन आजार आहे. मुलांमध्ये आढळणारा हा हिपॅटायटीस बी चा सर्वात सामान्य प्रकार आहे. क्रॉनिक हेपेटायटीस बी हा एक दीर्घकालीन आजार आहे, ज्यामुळे यकृत निकामी होणे आणि यकृताचा कर्करोग यांसारख्या गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. हिपॅटायटीस बी च्या वाहकांच्या रक्तात विषाणू असतो, परंतु त्यांच्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत.

### हिपॅटायटीस बी निदानाचे प्रकार

हिपॅटायटीस बी चे निदान करण्यासाठी, डॉक्टर तुमची संपूर्ण शारीरिक तपासणी करतील आणि तुमचे यकृत सुजले आहे का हे पाहण्यासाठी तुमच्या रक्ताची तपासणी करतील. जर तुमच्या नमुन्यांमध्ये यकृत एन्झाइम्सची पातळी जास्त असेल, तर तुमची हिपॅटायटीस बी सरफेस अँटीजेन आणि अँटीबॉडी आणि हिपॅटायटीस बी सरफेस अँटीबॉडी साठी तपासणी केली जाईल. हिपॅटायटीस बी सरफेस अँटीजेन आणि अँटीबॉडी रक्ताच्या तपासणीत दिसण्यासाठी साधारणपणे १० आठवडे लागतात. तुम्ही पूर्णपणे बरे झाल्यावर ४-६ महिन्यांत अँटीबॉडीजची पातळी लक्षणीयरीत्या कमी होते आणि त्या नाहीशा होतात. जर सहा महिन्यांनंतरही तुमच्या शरीरात अँटीबॉडीज उपस्थित असतील, तर तुम्हाला हिपॅटायटीस बी चा क्रॉनिक प्रकार असल्याचे निदान केले जाते. एचबीएसएजी अँटीबॉडीजमुळे तुम्हाला हिपॅटायटीस बी विरुद्ध प्रतिकारशक्ती मिळते. जर तुमच्या आजाराचे रूपांतर दीर्घकालीन आजारात झाले, तर तुमचे डॉक्टर लिव्हर बायोप्सी करण्याचा सल्ला देऊ शकतात. यामुळे त्यांना आजार किती गंभीर आहे हे कळेल. यकृताचे किती नुकसान झाले आहे हे पाहण्यासाठी डॉक्टर तुम्हाला अल्ट्रासाऊंड करून घेण्याचा सल्लाही देऊ शकतात.

# हुंड्याचे समाजशास्त्र उच्चशिक्षित झालात; पण विचार बदलले का?

भारतीय समाजाने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. मुली आज शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, संशोधन, उद्योग, राजकारण, संरक्षण, समाजकार्य आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. स्त्री-पुरुष समानता, महिला सक्षमीकरण आणि मानवी हक्क यांवर आज मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. विद्यापीठांमध्ये समाजशास्त्र, समाजकार्य, लिंगभाव आणि स्त्री अभ्यास शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र आणि मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी, इतिहास, अर्थशास्त्र यांसारख्या विषयांमधून मानवी मूल्य, समानता, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांचे शिक्षण दिले जाते.

परंतु या सर्व प्रगतीच्या पार्श्वभूमीवर एक प्रश्न आजही अस्वस्थ करतो. उच्चशिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली असूनही उच्चशिक्षितांमध्ये विवाहाच्या वेळी हुंडा घेण्याची प्रथा का टिकून आहे? शिक्षण वाढले, पदव्या वाढल्या, पगार वाढले, प्रतिष्ठा वाढली; पण विचार खरोखर बदलले का?

समाजशास्त्राच्या दृष्टीने हुंडा हा केवळ विवाहाच्या वेळी होणारा आर्थिक व्यवहार नाही. तो पितृसत्ताक सामाजिक रचना, स्त्रीविषयीची दुय्यम मानसिकता, सामाजिक प्रतिष्ठेची स्पर्धा, आर्थिक विषमता आणि परंपरेच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाचे प्रतीक आहे. समाज ज्या मूल्यांना मान्यता देतो, त्या मूल्यांच्या आधारेच अशा प्रथा टिकून राहतात.

सामाजिक कार्य करत असताना माझी सुरुवातीची समजूत अशी होती की हुंडा ही समस्या मुख्यतः अशिक्षित किंवा ग्रामीण समाजात अधिक असेल. परंतु प्रत्यक्ष अनुभव, विविध प्रकरणांचे निरीक्षण आणि सामाजिक वास्तवाचा अभ्यास करताना लक्षात आले की अनेक वेळा उच्चशिक्षित समाजातही हुंड्याचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होतात. फरक इतकाच की ते अधिक सुसंस्कृत भाषेत आणि प्रतिष्ठेच्या आवरणाखाली केले जातात.

आज ' हुंडा ' हा शब्द कमी वापरला जातो; त्याऐवजी ' भेट ' ' मुलीच्या भवितव्यासाठी ' , 'लग्नातील सहकार्य ', गिफ्ट ', फर्निचर ', 'वाहन ', फ्लॅट ' किंवा 'लग्नाचा खर्च ' अशा नावांनी नव्या रूपातील हुंड्याचे समर्थन केले जाते. हुंड्याचे नाव बदलले, पण व्यवहार बदललेला नाही.

यातील सर्वात मोठा विरोधाभास म्हणजे समाजशास्त्र, समाजकार्य, शिक्षणशास्त्र किंवा मानसशास्त्र, मराठी, इतिहास, अर्थशास्त्र, विधी यांसारख्या मानवविज्ञान यांसारख्या विषयांचे शिक्षण घेणाऱ्या किंवा तेच विषय महाविद्यालयात शिकवणाऱ्या काही व्यक्ती स्वतःच्या विवाहाच्या वेळी लाखो रुपयांचा हुंडा स्वीकारतात.

सामाजिक शास्त्रांमध्ये हुंडा विरोधी आंदोलन, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, मानवी हक्क आणि हुंडाबंदी शिकतात आणि शिकवतात. समानता यावर काथ्याकूट करतात. विविध न्यायाच्या सिद्धांतांचा अभ्यास करतात. पण स्वतःच्या आयुष्यात त्याच मूल्यांना हरताळ फासायचा. हा विरोधाभास केवळ वैयक्तिक नाही; तो शिक्षणव्यवस्थेलाच प्रश्न विचारणारा आहे.

अनेकदा नोकरी, व्यवसायासाठी लागणाऱ्या पैसे प्राप्त करण्यासाठी अनेक उच्चशिक्षित लोक विवाहाच्या वेळी मुलीकडून हुंडा घेण्यासाठी सल्ला देतात. असा सल्ला देण्यात उच्चशिक्षित आणि उच्चपदस्थ महिलासुद्धा मागे नसतात. प्रत्यक्ष हुंडा घेण्याच्या आणि हुंड्या घेण्यासाठी सामाजिक मान्यता घडवणाऱ्या अशा घटना अपवादात्मक नाहीत.

अनेक ठिकाणी सरकारी अधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर, अभियंते, वकील किंवा इतर प्रतिष्ठित नोकरी करणाऱ्या युवकांचा लग्नाच्या बाजारात जणू "भाव" ठरवला जातो.सरकारी नोकरी म्हणजे इतका हुंडा, परदेशात नोकरी म्हणजे त्याहून अधिक, असे अलिखित दर समाजात फिरताना दिसतात.महात्मा जोतीराव फुले क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महामानवांच्या अथक संघर्षामुळे आज समाजात अनेकांना संधी प्राप्त झाली. आज असंख्य मुले सामाजिक न्यायाच्या अंतर्गत स्थापन वसतिगृहांमध्ये, शिष्यवृत्यांवर शिक्षण पूर्ण करतात. संशोधने पूर्ण करतात. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी लागणार असली किंवा लागली की प्रचंड हुंडा घेतात. ज्या सामाजिक न्यायाच्या धोरणातून त्यांना शिक्षणाची संधी मिळाली, त्याला विसरून हुंडा घेणारे असे लोक लैंगिक असमानता पाळतात. विषमतेचे मूल्य जोपासतात. **क्रमशः**

प्रफुल्ल मंदा श्रीधर
सामाजिक कार्यकर्ता/जिल्हा कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती.

# आधुनिक भारताचे निर्माता लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

बाळ गंगाधर टिळक हे एक भारतीय स्वातंत्र्यसेनानी, शिक्षक, संपादक आणि लेखक होते. ते लाल-बाल-पाल या त्रिकुटापैकी एक होते. टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले नेते होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणले. त्यांना 'लोकमान्य' ही पदवी देखील बहाल करण्यात आली, ज्याचा अर्थ 'लोकांनी त्यांचा (नेता म्हणून) स्वीकार केला' असा होतो. महात्मा गांधींनी त्यांना 'आधुनिक भारताचा निर्माता' म्हणले.

टिळक हे स्वराज्याचे पहिले आणि प्रबळ पुरस्कर्ते होते. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक मजबूत जहालवादी नेते होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!' या त्यांच्या घोषणेसाठी ते ओळखले जातात. टिळकांचे बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, अरबिंदो घोष, व्ही.ओ. चिदंबरम पिल्लई आणि मुहम्मद अली जिना यांच्यासह अनेक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नेत्यांशी घनिष्ट संबंध होते.



केशव गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे एका मराठी हिंदू चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला, जे सध्याच्या महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याचे मुख्यालय आहे (तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सी ). त्यांचे वडिलोपार्जित गाव चिखली होते. त्यांचे वडील गंगाधर टिळक हे शाळेत शिक्षक होते आणि टिळक सोळा वर्षांचे असताना त्यांचे निधन झाले. १८७१ मध्ये, वडिलांच्या मृत्यूच्या काही महिने आधी, सोळा वर्षांचे असताना, टिळकांचा तापीबाई यांच्याशी विवाह झाला. लग्नानंतर त्यांचे नाव बदलून सत्यभामाबाई ठेवण्यात आले.

१८७७ मध्ये त्यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून गणित विषयात प्रथम श्रेणीत कला शाखेची पदवी घेतली. एल.एल.बी. कोर्समध्ये शिक्षण घेण्यासाठी त्यांनी एम.ए.चा अभ्यासक्रम अर्धवट सोडला आणि १८७९ मध्ये त्यांनी सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी पदवी प्राप्त केली. पदवी घेतल्यानंतर टिळकांनी पुण्यातील एका खाजगी शाळेत गणित शिकवायला सुरुवात केली. पुढे नवीन शाळेतील सहकाऱ्यांशी वैचारिक मतभेद झाल्याने त्यांनी माघार घेतली आणि पत्रकार बनले. टिळकांनी सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. ते म्हणायचे: 'धर्म आणि व्यावहारिक जीवन वेगळे नाही. केवळ स्वतःसाठी काम न करता देशाला आपले कुटुंब बनवणे हाच खरा आत्मा आहे. पुढची पायरी म्हणजे मानवतेची सेवा करणे आणि त्याही पुढची पायरी म्हणजे देवाची सेवा करणे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या प्रेरणेने, १८८० मध्ये गोपाळ गणेश आगरकर, महादेव बल्लाळ नामजोशी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर या त्यांच्या काही महाविद्यालयीन मित्रांसह त्यांनी प्राथमिक माध्यमिक शिक्षणासाठी न्यू इंग्लिश स्कूलची सह-स्थापना केली. भारतातील तरुणांसाठी शिक्षणाचा दर्जा सुधारणे हे त्यांचे ध्येय होते. शाळेच्या यशामुळे त्यांनी १८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून एक नवीन शिक्षण प्रणाली तयार केली ज्याने भारतीय संस्कृतीवर जोर देऊन तरुण भारतीयांना राष्ट्रवादी विचार शिकवले. याच सोसायटीने १८८५ मध्ये माध्यमिकोत्तर व पदवी शिक्षणासाठी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. टिळक हे फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक होते.

१८९० मध्ये उघडपणे राजकीय कार्य करण्यासाठी टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडली. त्यांनी धार्मिक आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनावर भर देऊन स्वातंत्र्याच्या दिशेने एक व्यापक चळवळ सुरू केली.

### जहालवाद विरुद्ध मवाळवाद

तत्कालीन भारतीय नेतृत्वात भारतास स्वातंत्र्य मिळण्यासाठी इंग्रजांशी व्यवहार कसा असावा याबद्दल दोन स्पष्ट मतप्रवाह होते. इंग्रजांशी जुळवून घेउन भारतास स्वातंत्र्य देण्यास त्यांची मनधरणी करणे हा मतप्रवाह मवाळवाद समजला जातो तर इंग्रजांनी भारतास स्वातंत्र्य दिलेच पाहिजे व त्यासाठी त्यांच्याशी असलेले मतभेद उघड करून वेळ आल्यास कारवाया, आंदोलने करणे हा मतप्रवाह जहालवाद समजला जातो. टिळक जहालवादी होते.

लोकमान्य टिळकांनी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत ब्रिटिश राजवटीपासून भारतीय स्वतंत्रता व स्वायत्ततेसाठी लढा दिला. महात्मा गांधी यांच्या आधी ते सर्वात प्रसिद्ध भारतीय राजकीय नेते होते. त्यांचे समकालीन सहकारी गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विपरीत टिळक हे प्रखर राष्ट्रवादी परंतु सामाजिक परंपरावादी मानले जात होते. त्यांना अनेक प्रसंगी तुरुंगवास भोगावा लागला. मंडाले येथे ते दीर्घकाळ तुरुंगात होते. त्यांच्या राजकीय जीवनाच्या एका टप्प्यावर ब्रिटिश लेखक सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी त्यांना 'भारतीय अशांततेचे जनक' म्हणले होते.

टिळक १८९० मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांनी विशेषतः स्वराज्याच्या लढ्यासाठी काँग्रेसच्या मवाळ वृत्तीला विरोध केला. तो त्यावेळच्या सर्वात प्रतिष्ठित जहालवादींपैकी एक होते. खरेतर १९०५-१९०७ च्या स्वदेशी चळवळीमुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये मवाळवादी आणि जहालवादी अशी विभागणी झाली होती.

१८९६ च्या उत्तरार्धात बुबोनिक प्लेगचा प्रसार मुंबई ते पुण्यापर्यंत झाला. जानेवारी १८९७ पर्यंत या रोगाने महामारीचे रूप धारण केले. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी ब्रिटिश भारतीय सैन्य आणले गेले आणि प्लेगला आळा घालण्यासाठी कठोर उपाय योजले गेले, ज्यात खाजगी घरांमध्ये सक्तीने प्रवेश, घरातील रहिवाशांची तपासणी, रुग्णालये आणि अलग ठेवण्याच्या शिबिरांमध्ये स्थलांतरित करणे, वैयक्तिक वस्तू काढून टाकणे आणि नष्ट करणे समाविष्ट आहे. मालमत्ता, आणि रुग्णांना शहरात प्रवेश करण्यापासून किंवा सोडण्यापासून प्रतिबंधित करणे. मे महिन्याच्या अखेरीस साथीचे रोग नियंत्रणात आले. साथीच्या रोगाला आळा घालण्यासाठी वापरण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे भारतीय जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली. टिळकांनी हिंदू धर्मग्रंथ, भगवद्गीता उद्धृत करून केसरी (केसरी मराठीत लिहिला होता, आणि 'मराठा' इंग्रजीत लिहिला गेला होता) मध्ये प्रक्षोभक लेख प्रकाशित करून हा मुद्दा उचलला, की कोणाला दोष देता येणार नाही. बक्षीसाचा कोणताही विचार न करता अत्याचारी व्यक्तीला मारले. यानंतर, २२ जून १८९७ रोजी, कमिशनर रँड आणि आणखी एक ब्रिटिश अधिकारी, लेफ्टनंट आयर्स्ट यांना चापेकर बंधू आणि त्यांच्या इतर साथीदारांनी गोळ्या घालून ठार केले.

इ.स. १८९६ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. टिळकांनी शेतकऱ्यांना संघटित होण्याचे आवाहन केले तसेच त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक केले. आपल्या केसरी या वर्तमानपत्राद्वारे त्यांनी सरकारला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. ब्रिटिश सरकार 'दुष्काळ विमा निधी' अतंर्गत लोकांकडून पैसा गोळा करत असे. त्याचा वापर लोकांसाठी करण्यात यावा असे त्यांनी सरकारला ठणकावून सांगितले.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. २३ जुलै २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com





# अकोला जिल्ह्यात बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद







**अकोला :** दिल्ली येथे जंतरमंतर वरील आंदोलन दरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या बंदला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शैक्षणिक संस्था, व्यापारी प्रतिष्ठान बंद होते. काही ठिकाणी मोर्चा काढून निषेध केला.

### विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ पातूर कडकडीत बंद; वंचित शिवसेनेचा मोर्चा

**पातूर :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या संयुक्त आवाहनाला गुरुवारी पातूर शहरात अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शहरातील मुख्य बाजारपेठेसह जवळपास सर्वच व्यावसायिक प्रतिष्ठाने दिवसभर बंद राहिल्याने बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले.

बंदच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक सेवा व नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी दवाखाने, रुग्णालये व औषधालयांना बंदमधून सूट देण्यात आली होती. त्यामुळे आरोग्य सेवा सुरळीत सुरू राहिल्या.

यानंतर वंचित बहुजन आघाडी व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी पातूर शहरातील मुख्य बाजारपेठेतून भव्य निषेध मोर्चा काढत विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा तीव्र निषेध व्यक्त केला. मोर्चादरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईचा निषेध करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पातूर शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ व संवेदनशील ठिकाणी पोलीस आणि होमगार्डचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पातूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार आर. टी. जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दिवसभर परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत शांतता राखण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे बंद आणि मोर्चा शांततेत पार पडला. शहरातील व्यापारी, नागरिक व विविध सामाजिक घटकांनी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने संपूर्ण शहरात दिवसभर शुकशुकाट होता.

### हिवरखेड बंदला व्यापा-यांचे समर्थन

हिवरखेड येथील बंदला व्यापाऱ्यांनी समर्थन दिले. त्यामुळे बाजारपेठेत गुरूवारी सकाळ पासून शुकशुकाट होता. वंचित आघाडी हिवरखेडने आजच्या बंद साठी पुढाकार घेतला होता.

### बार्शीटाकळी येथे बंदला उत्तम प्रतिसाद

बार्शीटाकळी येथे वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष गोरसिंग राठोड व शहराध्यक्ष आजार पठाण यांनी वंचित बहुजन आघाडी तर्फे बार्शीटाकळी शहरवासीयांना प्रत्येक दुकानदारांना एक दिवस बंद ठेवण्याची विनंती केली होती. त्या नुसार बार्शीटाकळी बंदला प्रतिसाद मिळाला. आज वंचित बहुजन आघाडीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळून मोर्चा काढला. मोर्चा मिनार मशीद, बाजार लाईन, नगरपंचायत चौक, पोलीस स्टेशन समोरून तहसील कार्यालय येथे आला. येथे

आपापल्या व्यथा मांडल्या. मोर्चामध्ये वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते तसेच प्रत्येक पार्टीचे कार्यकर्ते सामील होते. कोणताही भेदभाव न ठेवता दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर जे अन्याय झाले त्या अन्यायाला न्याय मिळावा याकरिता प्रत्येक पार्टीचे व समाजाचे लोक एकजुटीने एकत्र आले होते. पोलिस बंदोबस्त चोख होता.

**अडगाव बु. :** येथे बंदला उत्तम प्रतिसाद मिळाला. व्यापारी प्रतिष्ठाने बंद असल्याने बंदची तीव्रता सकाळ पासून जाणवत होती. पोलिस बंदोबस्त होता.

### नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ अकोट बंद; संघटना, पक्ष व नागरिकांचा प्रतिसाद

**अकोट :** दिल्ली येथे सुरू असलेल्या कथित NEET पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या विरोधात गुरुवारी अकोट शहरात महाराष्ट्र बंदला व्यापक प्रतिसाद मिळाला. विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, व्यापारी संघटना, विद्यार्थी व पालकांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत निषेध नोंदविला.

गेल्या महिनाभरापासून नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थी शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन करत असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनाला जागतिक ख्यातीचे संशोधक सोनम वांगचुक यांनीही पाठिंबा दिल्याची चर्चा असून, विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते.

या बंदला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा जाहीर केला होता. त्यानुसार शिवसेना उपनेते तथा आमदार नितीन देशमुख, माजी आमदार संजय गावंडे, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर तसेच मुकेश मुरूमकार यांनीही महाराष्ट्र बंदला समर्थन दिले. शिवसेना (UBT) अकोटच्या वतीने उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, तालुकाप्रमुख अविनाश गावंडे व शहरप्रमुख ॲड. मनोज खंडारे यांनी नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले होते.

### विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुर्तीजापूर :** वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला मुर्तीजापूर शहरात चांगला प्रतिसाद मिळाला.

या बंदला विविध राजकीय, सामाजिक व विद्यार्थी संघटनांनी सक्रिय पाठिंबा देत आंदोलनात सहभाग नोंदविला.

मुर्तीजापूर येथील वंचित बहुजन आघाडी, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), संभाजी ब्रिगेड, मुर्तीजापूर युवा समिती, अकोला महाराष्ट्र शेतकरी संघटना, अखिल भारतीय कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ तसेच जिल्हा बिल्डिंग बांधकाम मजूर असोसिएशनच्या वतीने बंदला पाठिंबा जाहीर करण्यात आला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे सुनील सदार, योगिता वानखडे, संजय नाईक, शेख इमरान, शेख खलील, रवी इंगळे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष उज्वल ठाकरे, शिवसेना तालुकाध्यक्ष गजानन चौधरी, अरविंद तायडे, छबिले पाटील, उदय शिंदे, बाळासाहेब खांडेकर, उमेश इंगळे, सचिन गुल्हाने यांच्यासह विविध विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लिनेस क्लब ऑफ अकोलाची मासिक सभा उत्साहाने संपन्न





**अकोला :** लिनेस क्लब ऑफ अकोलाची मासिक सभा लि. प्रियंका पडगीलवार यांच्या 'यश निवास', मराठा नगर येथील निवासस्थानी १६ जुलै रोजी संपन्न झाली.मीटिंगचा उद्देश क्लबच्या माजी अध्यक्षांचा सन्मान करणे हा होता; ज्यांनी आपल्या कार्यकाळात आपला अमूल्य वेळ, कार्यनिष्ठा, नवीन उपक्रम, सामाजिक दृष्टी आणि बांधिलकी जपत लिनेस क्लबला पुढे नेले. सभेच्या आयोजनाची जबाबदारी लि. प्रियंका पडगीलवार, लि. प्रीती कमावीजदार, लि. वीना वोरा, लि. मोना पारेख आणि लि. मौसमी ठाकूर यांनी अत्यंत उत्साहाने आणि उत्कृष्टपणे सांभाळली.

स्वागत, प्रार्थना आणि राष्ट्रगीत लि. गीता रूपारेलिया यांनी अतिशय सुरेल आवाजात सादर केले. क्लबच्या अध्यक्षा लि. राजश्री समनपुरे यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर, लिनेस क्लबच्या सचिव लि. वनीता बिजवे यांनी सचिव अहवाल (रिपोर्ट) सादर केला.

"रिमझिम पावसाच्या सरींनी हिरवीगार झाली धरती, आपण सर्व आहात आमच्या सत्कारमूर्ती. शाल, पुष्प अन् रोपाचा स्वीकार करावा हीच विनंती..." या भावनेतून लिनेस क्लबच्या अध्यक्षा राजश्री समनपुरे यांच्या हस्ते सर्व माजी अध्यक्षांचा शाल, पुष्प आणि रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. माजी अध्यक्ष पीडीपी लि. हरविंदर कौर सेठी, पीडीपी लि. उषाजी बाहेती, पीडीपी लि. आशाजी विरवाणी, पीडीपी लि. सुनंदाजी गुप्ता, पीडीपी लि. स्वातीजी झुनझुनवाला, डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंट लि. कल्पनाजी देशमुख, माजी अध्यक्ष लि. इंद्राणीजी देशमुख, लि. उषाजी भादू, लि. अर्चनाजी पातुरकर, लि. चंदा दीदी जायसवाल, लि. प्रियंकाजी पडगीलवार, लि. रत्नमालाजी रूईकर, लि. इंदू तिवारीजी, लि. शोभाजी राठी, लि. राजेश्रीजी देशमुख, लि. अनिताजी उपाध्याय, लि. दिनाजी शाह, लि. मंजूषाताई देशमुख, लि. ममताजी सूर्या, लि. अनीताजी उपाध्याय, लि. सुलेखाजी गुप्ता, लि. अनीषाजी वखारिया, लि. इंदुजी तिवारी या सर्वांचा क्रमाने सत्कार करण्यात आला व आभार व्यक्त करण्यात आले.

सर्व मान्यवरांनी आपले अनुभव आणि विचार मोजक्या शब्दांत व्यक्त करून लिनेस सदस्यांशी शेअर केले. पर्यावरण संवर्धन पोस्टर स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक अनुक्रमे सुलेखाजी गुप्ता आणि उमाजी बजुरिया यांनी पटकावला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लि. प्रीती कमावीजदार आणि लि. वनिता बिजवे यांनी केले.

# एक विषय वगळता सर्व विषयांना स्थायी समिती सभेत मंजुरी

**- सभा नियमबाह्य असल्याचा सागर भारुका यांचा आरोप**
**- सभा सुरू ठेवण्यासाठी घेण्यात आले मतदान**



**अकोला :** आज महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभेचे आयोजन शहरातील विकास कार्य, पाणीपुरवठा, विविध विषयांच्या निविदा, तसेच मूलभूत सुविधांशी संलग्नित 10 विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी करण्यात आले होते. सभा सुरू होताच शिवसेनेचे सागर भारुका यांनी सभेचा अजेंडा रात्री बारा वाजता मिळाल्याने सभेतील विषयांवर काय बोलावे याचा अभ्यास झाला नसल्याने सभा ही नियमबाह्य असल्याचा आरोप करीत सभा रद्द करण्याची मागणी केली. त्यानंतर सभा सुरू ठेवण्यासाठी मतदान घेण्यात आले सभा सुरू ठेवण्यासाठी 11 जणांनी हात वर केल्याने सागर भारुका यांनी सभा त्याग केला. त्यानंतर सभा सुरू करण्यात आली प्रत्येक प्रभागातील नाला सफाई सात दिवसात न झाल्यास संबंधित ठेकेदारावर दुपटीने दंड आकारण्याची कारवाई करावी असे आदेश सभापतींनी दिले शहरातील शेल्टर हाऊसचे काम 30 ऑगस्टपर्यंत होईल सध्या भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणा साठी करण्यासाठी नंदुरबार येथील कंपनीचे काम दोन दिवसात सुरू होईल अशी माहिती सभेत देण्यात आली. यासोबतच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगर रोड महाबिया 2025 26 अंतर्गत महानगरपालिकेसाठी 0.4 घनमीटर क्षमतेचा रिफ्यूज कॉम्पॅक्टर खरेदी करण्यासाठी जेम पोर्टल वरील निविदेबाबत प्रस्ताव मंजूर करणे, राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत मोठी उमरी स्मशानभूमीत हवा प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारण्याच्या कामाला मंजुरी देणे, शहरातील विविध मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा पेवर ब्लॉक बसविणे, महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी विविध पदांवरील कंत्राटी मनुष्यबळाच्या वेतन खर्चास मंजुरी देणे, पीएम ई बस सेवा योजने साठी शहरात तांत्रिक सल्लागार नियुक्त करणे आदी विषयांना मंजुरी देण्यात आली तर महापालिकेतील विविध पदाधिकारी व अधिकारी यांना दिल्या गेलेल्या वाहनांच्या भाडेवाडी चर्चा करून निर्णय घेणे हा विषय मात्र नामंजूर करण्यात आला.

### त्या ठेकेदाराला ५० हजाराचा दंड

बैठकी दरम्यान गटार बांधकामाच्या कामात गंभीर त्रुटी आणि हलगर्जीपणा आढळल्याने संबंधित ठेकेदारावर तात्काळ ५० हजारांचा दंड ठोठावण्याचे आदेश सभापतींनी दिले. नागरिकांच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांमध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. याच बैठकीत शिक्षण अधिकारी विनापरवानगी गैरहजर राहिल्याचा मुद्दा समोर आला. या प्रकाराची गंभीर दखल घेत सभापती विजय अग्रवाल यांनी संबंधित शिक्षण अधिकाऱ्याला 'शो कॉज' नोटीस बजावण्याचे आदेश प्रशासनाला दिले. स्थायी समितीच्या बैठकीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा संदेश यावेळी देण्यात आला. महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकासकामे, शिक्षण आणि प्रशासनातील हलगर्जीपणावरून चांगलाच गदारोळ झाला. स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांनी कामातील निष्काळजीपणाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना कडक शब्दांत धारेवर धरत जबाबदारी निश्चित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

# रेडवा येथील शेतकरी आत्महत्याग्रस्त परिवाराचा नाहक छळ

**- नायब तहसीलदाराच्या व्हिडिओतील दाव्यानंतर शेतातून रस्ता आदेश**
**- नियमबाह्य रस्त्याचा आदेश करत महिला शेतकऱ्याला त्रास का**

प्रतिनिधी २३ जुलै



अकोला : बार्शीटाकळी तालुक्यातील रेडवा येथील एका शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबावर स्थानिक प्रशासनाकडून नाहक अन्याय व छळ केला जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. वीस वर्षांपुर्वी शेतकरी मोतीराम वानखडे आत्महत्या केली होती. त्यांच्या पत्नी श्रीमती इंदुताई मोतीराम वानखडे यांच्या शेतातून तहसीलदारांनी नियमबाह्य पद्धतीने रस्ता देण्याचा आदेश काढल्याने प्रशासनाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष पाहणी करताना नायब तहसीलदारांनी स्वतः व्हिडिओ रेकॉर्डिंगमध्ये मान्य केले आहे की, संबंधित ठिकाणी शिवदांडा अर्थात पारंपरिक मार्ग उपलब्ध आहे. व्हिडिओमध्ये स्वतः नायब तहसीलदार अक्षय नागे हे शिवदांडा असल्याचा आणि रस्ता पूर्ववत चालू असल्याचा दावा करत आहे. तर मंडळ अधिकारी प्रमोद ठोसर यांनी एकाच ठिकाणी बसून पंचनामा केल्याचा दावा केला जात आहे. त्यांनी शिवदांडाचा रस्ता सुरु आहे की नाही याची खातरजमा केली नाही. एका ठिकाणी बसून इंदूताई वानखडे यांच्या विरोधातील भूमिकेत महत्वाची भूमिका बजावली.

असे असताना बार्शिटाकळी तहसीलदारांनी मात्र इंदुताई वानखडे यांच्या मालकीच्या शेतातून नवीन रस्ता देण्याचा आदेश कसा पारित केला असा प्रश्न उपस्थित होतो. मुळात राज्याच्या महसूल व वन विभागाने दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी विशेष परिपत्रक जारी करून स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यात दुहेरी रस्त्यास मनाई केली आहे. जर शेतकऱ्याला शेतात जाण्यासाठी पूर्ववत किंवा पर्यायी रस्ता उपलब्ध असेल, तर कोणत्याही परिस्थितीत नवीन किंवा दुहेरी रस्ता मंजूर करण्यात येऊ नये. वैयक्तिक फायद्यासाठी दुसऱ्याच्या शेतातून नवीन रस्ता देता येणार नाही. बार्शिटाकळी तहसिलदारांनी नियमांचे उल्लंघन करून रस्ता मंजूर केला आहे. नायब तहसीलदारांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या शेतातून रस्ता देण्याचा एकतर्फी आदेश काढला कसा अशी विचारणा आता इंदूताई वानखडे करत आहे. या विषयावर सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल ढोरे यांनी तहसीलमध्ये नायब तहसीलदार यांना शासनाच्या आदेशाची कॉपी दाखवित इंदूताई यांना न्याय देण्याची मागणी केली. या सर्व प्रकरणात इंदूताई यांना न्याय मिळू नये म्हणून बार्शिटाकळी तहसीलदारांनी काढलेल्या आदेशाची कॉपी तब्बल महिन्या भराने देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दरम्यान,या सर्व प्रकरणात तहसीलदारांच्या आदेशाला उपविभागीय अधिकारी यांनी पुर्णतः स्थगिती दिली आहे. शासनाकडून 'दिलासा' योजनेअंतर्गत मदत मिळणाऱ्या आत्महत्याग्रस्त कुटुंबाचा असा प्रशासकीय छळ करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# अकोट नगर परिषदेच्या जन्म-मृत्यू विभागाचा मनमानी कारभार

प्रतिनिधी २३ जुलै

**अर्जाची अधिकृत पोचपावती मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप**

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या जन्म-मृत्यू विभागामध्ये सध्या मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पालिकेत येणाऱ्या नागरिकांना त्यांनी सादर केलेल्या अर्जाची अधिकृत पोचपावती दिली जात नसल्याने, नागरिकांच्या अर्जाला प्रशासकीय पातळीवर काही किंमत उरली आहे की नाही, अशी चर्चा आता शहरात रंगू लागली आहे. आवक-जावक विभागाकडून टोलवाटोलवीनियमानुसार नगर परिषदेत येणारा प्रत्येक अर्ज हा सर्वप्रथम आवक-जावक विभागात स्वीकारला जाणे बंधनकारक आहे. मात्र, अकोट नगर परिषदेचा आवक-जावक विभाग हे अर्ज स्वीकारण्यास नकार देत असून, नागरिकांना थेट जन्म-मृत्यू विभागात अर्ज जमा करण्यास सांगितले जात आहे. यामुळे पालिकेच्या मुख्य नियमावलीलाच केराची टोपली दाखवली जात असल्याचे चित्र आहे.केवळ नंबर टाकून 'ओ.सी.' देण्याचा नवा फंडानागरिक जेव्हा आपला अर्ज घेऊन थेट जन्म-मृत्यू विभागात जातात, तिथेही त्यांना नियमाप्रमाणे पालिकेचा अधिकृत शिक्का आणि जबाबदार अधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेली पोचपावती दिली जात नाही. त्याऐवजी अर्जावर केवळ एक साधा नंबर टाकून ओ.सी. दिली जात असल्याचे पीडित नागरिकांनी सांगितले.

अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीशिवाय केवळ नंबर असलेल्या या प्रतीला भविष्यात कोणताही कायदेशीर आधार उरणार नाही, अशी भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणीया ढिसाळ आणि मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले मिळवण्यासाठी पालिकेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.या गंभीर प्रकाराची दखल घेऊन अकोट नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ या विभागात सुधारणा करावी आणि आवक-जावक विभागामार्फत अधिकृत पोचपावती देण्याची व्यवस्था पूर्ववत करावी, अशी मागणी अकोटच्या नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# जन्माचे दाखले तात्काळ उपलब्ध करा

**बसपाची तहसीलदारांकडे मागणी**

**बाळापूर :** न. प. बाळापूर मध्ये १ वर्षापासून जन्माचे दाखले मिळेनासे झाल्यामुळे संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचे लाभार्थी तथा विद्यार्थी यांना अतोनात त्रास होत आहे. याबाबत नागरिकांनी, सामाजिक संघटनांनी वेळोवेळी न. प. तथा आपल्या कार्यालयांमध्ये लेखी निवेदन सादर केले. परंतु आजपर्यंत यावर कुठलीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे दाखले तातडीने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी बसपाचे बाळापूर विधानसभा अध्यक्ष कैलास हिवराळे यांनी निवेदनात केली आहे.

जन्माचे प्रमाणपत्र तात्काळ देऊन श्रावणबाळ योजनेचे वृद्ध लाभार्थी, विद्यार्थी व गरजवंत नागरिकांना सहकार्य करावे. अन्यथा न्याय मिळवून देण्यासाठी बहुजन समाज पार्टीचे वतीने आंदोलन छेडावे लागेल असा इशारा देखील हिवराळे यांनी दिला आहे.

## निधन वार्ता

### जनार्दन इंगळे



**शेगाव :** येथील जनार्दन शंकरराव इंगळे यांचे आज वयाच्या 68 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने शोककळा पसरली आहे.

### सुशिलाबाई इंगळे



**शेगांव :** येथील विद्या नगर येथील रहिवासी सुशिलाबाई इंगळे यांचे निधन झाले. त्यांचेवर दि 21 जुलै रोजी शेगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २३ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## राळेगाव-कळंब तालुक्यामध्ये होणार ८४ पाणंद रस्त्यांची कामे

प्रतिनिधी २३ जुलै



**राळेगाव** : राळेगाव विधानसभा क्षेत्रातील दोन तालुक्यांत पहिल्या टप्प्यात सात कोटी पन्नास लाख रुपयांची ८४ पाणंद रस्त्याची कामे केली जाणार आहे. राळेगाव तालुक्यात ४३ आणि कळंब तालुक्यात ४१ पाणंद रस्ते करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. पावसाळा संपल्यानंतर ही कामे सुरू केल्या जाणार असल्याने प्रशासनाने त्या दृष्टीने तयारी केली आहे.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कळंब या एजन्सीकडून या शेतरस्त्याची कामे केली जाणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यास, शेतीची कामे करण्यास व शेतमाल घरी आणण्यास सुविधा उपलब्ध होणार आहे.

# अंगणवाडी भरतीसाठी लाच ; महागावच्या बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्याला एसीबीने रंगेहात पकडले

### निवडीसाठी १० हजारांची मागणी; पहिला हप्ता ५ हजार स्वीकारताना कारवाई

प्रतिनिधी २३ जुलै




**महागाव** : महागाव तालुक्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेत लाच मागितल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

अंगणवाडी मदतनीस पदावर निवड करून देण्यासाठी १० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या बाल विकास प्रकल्प अधिकारी शकुंतला जयवंत इंगोले (५७) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) यवतमाळ पथकाने बुधवारी महागाव येथील त्यांच्या राहत्या घरी ५ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. या कारवाईमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

इजनी येथील २१ वर्षीय महिला अंगणवाडी मदतनीस पदासाठी उमेदवार होती. संबंधित पदावर निवड करून देण्याच्या मोबदल्यात आरोपी अधिकाऱ्यांनी तिच्याकडे १० हजारांची मागणी केली होती. लाच देण्यास नकार देत संबंधित महिलेने एसीबी, यवतमाळकडे तक्रार नोंदविली.

तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आल्यानंतर आरोपींनी तडजोडीअंती प्रथम हप्ता म्हणून ५ हजार स्वीकारण्यास आणि उर्वरित रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर घेण्यास सहमती दर्शवल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एसीबीने सापळा रचला.

पूर्वनियोजित योजनेनुसार तक्रारदार महिलेला आरोपींच्या महागाव येथील निवासस्थानी पाठविण्यात आले. आरोपींनी स्वयंपाकघरात ५ हजारांची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने छापा टाकला. गॅस ओट्याखालील कप्प्यात ठेवलेली लाचेची रक्कम पंचांसमक्ष व व्हिडिओ चित्रीकरणाच्या उपस्थितीत जप्त करण्यात आली. कारवाईदरम्यान आरोपींकडील व्हिवो कंपनीचा अँड्रॉइड मोबाईलही जप्त करण्यात आला असून, घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू होती.

या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली. महिला आरोपी असल्याने आणि कारवाई सूर्यास्तानंतर झाल्यामुळे त्यांना नोटीस बजावून सकाळी चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट यांनी पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

## ४२० देशी दारुच्या बाटल्यांसह तस्कर जेरबंद



प्रतिनिधी २३ जुलै

**उमरखेड** : ढाणकी येथून कुरळीकडे अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका तस्कराला दराटी पोलिसांनी अटक केली. या कारवाईत सुमारे ७० हजार रुपयांचा मुद्देमाल, त्यामध्ये ४२० देशी दारूच्या बाटल्या आणि एक दुचाकी, जप्त करण्यात आली. सोमवारी सकाळी ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ढाणकी येथून मोटारसायकलवरून अवैध देशी दारूची खेप कुरळी गावाकडे नेली जात असल्याची गुप्त माहिती दराटी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी नाकाबंदी करून संशयित दुचाकीस्वाराला अडवून झडती घेतली.

या तपासणीत मिलिंद दत्ता कदम (वय ३२, रा. ढाणकी) याच्याकडून ४२० देशी दारूच्या बाटल्या आणि दुचाकी असा एकूण सुमारे ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी दराटी पोलिसांनी संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, ठाणेदार गोपाळ इंद्राळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

## वर्धा अत्याचार प्रकरण : एसआयटी चौकशी, फास्ट ट्रॅक सुनावणीची मागणी

### निषेध मोर्चातील युवकांवरील गुन्हे मागे घेण्याचीही मागणी

प्रतिनिधी २३ जुलै



**पुसद** : वर्धा जिल्ह्यातील मौजा रोठा येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्येच्या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत करण्यात यावा, खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून दोषींना कायद्यानुसार कठोर शिक्षा द्यावी, तसेच पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा, अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्लीच्या वतीने करण्यात आली आहे. परिषदेचे विदर्भ अध्यक्ष चंद्रशेखर मडावी व वर्धा जिल्हाध्यक्ष शरद आडे यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक, वर्धा यांना निवेदन दिले.

निवेदनात या प्रकरणासाठी एसआयटी स्थापन करणे, फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालविणे, पीडित कुटुंबाला आर्थिक मदत व पुनर्वसन देणे, महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबविणे, शाळा व आदिवासी वसतिगृहांतील सुरक्षा अधिक मजबूत करणे, तसेच वर्धा येथे निषेध मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या युवकांवर दाखल झालेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे. मागण्यांवर त्वरित सकारात्मक निर्णय न झाल्यास समाजात तीव्र असंतोष निर्माण होऊ शकतो, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

यावेळी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे विभागीय अध्यक्ष माधवराव वैद्य, जिल्हाध्यक्ष ॲड. सुनीलभाऊ ढाले, अर्जुन हगवणे, तालुकाध्यक्ष गजानन टारफे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गारुळे, राजू गायकवाड, गजानन टाले, गणेश भुजाडे, विजय मुकाडे, ओंकार ढाकरे, संदीप आढाव, दत्ता बोलके, रंगराव भडांगे, बबलू मळघणे, तातेराव भडगे, विष्णू शिकारे, बालाजी उघडे, विठ्ठल उघडे, जयवंत भुरके, समाधान बळी, लक्ष्मण पांडे, रंगराव डाखोरे, मिथुन पांडे, शुभम तडसे, सूरज मोहकर, सचिन काळे, विजय वाळके, राजेश कपाटे, परमेश्वर आगोसे, पारेश्वर दळवे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## मालती रत्नपारखी यांच्या भक्तिमय स्वरांनी भाविक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी २३ जुलै



**दिग्रस** : भक्ती, संस्कृती आणि अध्यात्माचा वारसा जपत गेली तब्बल १८ वर्षे अखंड भजनसेवा करणाऱ्या श्रीमती मालती प्रकाश रत्नपारखी यांनी आपल्या सुमधुर, ओजस्वी आणि भावपूर्ण गायनातून भाविकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या भजने, अभंग आणि गवळणी ऐकण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

दिग्रस येथील श्री आप्पास्वामी मंदिरातील श्री आप्पास्वामी भजनी मंडळाशी संलग्न राहून त्या गेली १८ वर्षे सातत्याने भजनसेवा करीत आहेत. विठ्ठलभक्ती, कृष्णभक्ती, संतवाङ्मयातील अभंग तसेच पारंपरिक गवळणींचे त्यांच्या सुमधुर आवाजातील सादरीकरण श्रोत्यांना भक्तिरसात तल्लीन करून टाकते. शब्दांची स्पष्टता, भावपूर्ण मांडणी आणि भक्तिभावामुळे त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात आध्यात्मिक वातावरणाची अनुभूती मिळते. भजनाच्या माध्यमातून नैतिक मूल्ये, अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचे कार्य त्या सातत्याने करीत आहेत. विविध धार्मिक उत्सव, हरिनाम सप्ताह, कीर्तन महोत्सव, मंदिरातील कार्यक्रम तसेच सामाजिक-धार्मिक सोहळ्यांमध्ये त्यांनी आपल्या गायनाची प्रभावी छाप उमटविली आहे. विशेष म्हणजे, वयाच्या उत्तरार्धातही त्यांची भजनसेवा अविरत सुरू असून, कोणत्याही प्रसिद्धीच्या अपेक्षेशिवाय केवळ ईश्वरभक्ती आणि समाजप्रबोधनाच्या भावनेतून त्या ही सेवा करीत आहेत. त्यांच्या या निःस्वार्थ सेवेबद्दल विविध ठिकाणी त्यांचा सन्मान करण्यात आला असून, परिसरातील भजनप्रेमी त्यांच्याकडे आदराने पाहतात. भक्तीपरंपरा जिवंत ठेवत नव्या पिढीला भजन आणि गवळणीची प्रेरणा देण्याचे मोलाचे कार्य श्रीमती मालती रत्नपारखी करीत आहेत. त्यामुळे त्या दिग्रसच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जात आहेत. "भजन ही केवळ कला नसून ईश्वराशी जोडणारी साधना आहे," या भावनेतून सुरू असलेली त्यांची अखंड सेवा आजही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, त्यांच्या भक्तिमय स्वरांची मोहिनी श्रोत्यांच्या मनावर कायम आहे.

## शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोरील अडथळे दूर होईपर्यंत लढा सुरुच : कृती समितीचा इशारा

प्रतिनिधी २३ जुलै



**उमरखेड** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोरील भारत पेट्रोलियमच्या पेट्रोल पंपाचा प्रश्न निकाली निघेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समितीने बुधवारी पत्रकार परिषदेत दिला.

समितीचे अध्यक्ष अभय पवार यांनी सांगितले की, शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी गेल्या नऊ वर्षांपासून सातत्याने संघर्ष करण्यात आला. सुरुवातीला हा पुतळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उभारण्याचा प्रस्ताव होता. मात्र, समितीच्या आंदोलनामुळे आणि जनतेच्या पाठिंब्यामुळे प्रशासनाने निर्णय बदलला आणि अखेर छत्रपती शिवाजी महाराज चौकात अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला.

मात्र, पुतळ्यालगत असलेला भारत पेट्रोलियमचा पेट्रोल पंप ऐतिहासिक स्मारकाच्या परिसराला बाधा ठरत असल्याचा दावा समितीने केला. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे हरकत घेऊनही कोणताही ठोस निर्णय न घेता पेट्रोल पंपाची लीज आणखी पाच वर्षांसाठी वाढविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. या निर्णयाविरोधात विभागीय आयुक्तांकडे दाद मागण्यात आल्याचेही समितीने सांगितले.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये या मागणीसाठी १६ ते १७ दिवसांचे उपोषण करण्यात आले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने जागेची मोजणी केली. या मोजणीत अनेक विसंगती आढळल्याचा दावा समितीने केला. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २६२ वरील रस्त्याच्या मध्यरेषेपासून दोन्ही बाजूंना समान अंतर असणे आवश्यक असताना संबंधित नियमांचे पालन झाले नसल्याचे समितीचे म्हणणे आहे.

तसेच राष्ट्रीय महामार्ग क्षेत्रातील बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची ना हरकत (एनओसी) आवश्यक असतानाही ती न घेता परवानगी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. महामार्गाच्या मार्जिन लाईनपासून २० मीटरच्या आत बांधकामास मनाई असतानाही नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावाही समितीने केला.

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा तब्बल साडेतीन वर्षे अग्निशमन विभागाच्या गोदामात पडून होता. त्यानंतर नगर परिषदेसमोर मावळा संघटनेच्या सहकार्याने आंदोलन छेडल्यानंतर भूमिपूजन व पुतळा उभारणीचा मार्ग मोकळा झाला. आंदोलनादरम्यान सात कार्यकर्त्यांना अटक करून संविधानिक मार्गाने सुरू असलेले आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप त्यांनी केला.

पुतळ्यासमोरील अडथळे दूर होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील. लवकरच पुढील आंदोलनाची दिशा जाहीर करण्यात येईल, असे समितीने स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेला अभय पवार, गजानन देशमुख, सिद्धेश्वर जगताप, राहुल मोहितवार, गोपाल झाडे, बसवेश्वर शिरसागर तसेच कृती समितीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

## कोळशी तांडा अत्याचार प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

### दिग्रसकर संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी २३ जुलै



**दिग्रस** : दिग्रस तालुक्यातील माळहिवरा ग्रामपंचायतीअंतर्गत कोळशी तांडा येथे अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा निषेध करत दिग्रसकर संघटनेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना तहसीलदार, दिग्रस यांच्या मार्फत निवेदन सादर केले. आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करून पीडितेला तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संघटनेने निवेदनात म्हटले आहे की, या अमानुष घटनेमुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून महिला व बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे संबंधित आरोपीविरुद्ध लागू असलेल्या सर्व कायद्यांनुसार कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच प्रकरणाचा तपास निष्पक्ष, पारदर्शक आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावा तसेच खटला जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायालयात चालवून दोषीला कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

पीडित मुलीला तातडीने आवश्यक वैद्यकीय उपचार, मानसिक समुपदेशन, कायदेशीर सहाय्य आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी राज्यभर महिला व बालिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

राज्य सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन पीडितेला लवकर न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. दोषींना कठोर शिक्षा झाल्यास समाजात कायद्याचा धाक निर्माण होऊन अशा विकृत प्रवृत्तींना आळा बसेल, असा विश्वास दिग्रसकर संघटनेने व्यक्त केला आहे.

# SIR जनजागृतीसाठी पुसदमध्ये चर्चा सत्र

### 72 टक्के एन्युमरेशन फॉर्म भरले

प्रतिनिधी २३ जुलै



**पुसद** : स्थानिक मौलाना अबुल कलाम आझाद सार्वजनिक वाचनालयात विशेष गहन पुनरावलोकन (SIR) 2026 अंतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेबाबत जनजागृती आणि मार्गदर्शनासाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले. या बैठकीत SIR मॅपिंग, एन्युमरेशन फॉर्म सादर करणे, दस्तऐवज पडताळणी, नोटिसा तसेच विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. महोम्मद नदीम होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. अजमल अहमद, ॲड. अझहर खान, ॲड. जहीर खान, सय्यद इश्तियाक, आलियार जनाब आणि मोहम्मद अकील उपस्थित होते. शहरातील अनेक विधिज्ञांनीही चर्चासत्रात सहभाग नोंदविला.

यावेळी बीएलओ असरार दानिश आणि अकराम यांनी मॅपिंगची पद्धत, अनोमलीची नोंद, नोटिसा व आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती दिली. आतापर्यंत 72 टक्के एन्युमरेशन फॉर्म भरण्याचे काम पूर्ण झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

प्रास्ताविकात वाचनालयाचे संचालक ॲड. प्रा. मिर्झा आदिल बेग यांनी ड्राफ्टिंग, मॅपिंग आणि नोटिसांबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले. सय्यद इश्तियाक यांनी गढी वॉर्डातील मॅपिंग व फॉर्म भरणीची माहिती दिली.

ॲड. अजमल अहमद व ॲड. अझहर खान यांनी प्रत्येक वॉर्डात जाऊन नागरिकांना फॉर्म भरण्यासाठी मदत करण्याचा निर्धार व्यक्त केला. ॲड. तणवीर खान व ॲड. जहीर खान यांनी नोटिसांबाबत कायदेशीर सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. ॲड. मिसबाह खान, ॲड. शाहेबाज आणि ॲड. ताबिश यांनीही नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन केले.

नगरसेवक प्रतिनिधी फिरोज खान आणि गाजी उस्मा यांनी आपल्या वॉर्डातील बीएलओंच्या कामकाजाची माहिती दिली. तसेच विविध शासकीय योजनांचीही माहिती उपस्थितांना देण्यात आली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. महोम्मद नदीम यांनी SIR 2026 अंतर्गत उर्वरित 15 दिवसांत करावयाच्या कामांचा आढावा घेत दस्तऐवज पडताळणी, नोटिसा आणि अनोमलीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जन्मदाखल्यासह आवश्यक कागदपत्रांसाठी नागरिकांना मदत करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. तहसीन खान यांनी अनोमली संदर्भात आपले विचार व्यक्त केले.

आलियार जनाब यांच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. मोहम्मद अकील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गफ्फार, बाबूभाई, कलीमभाई, ॲड. सुफियान, ॲड. अमन आणि दानिश यांनी परिश्रम घेतले.

## जंतर-मंतरवरील आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा

### राष्ट्रपतींना तहसीलदारांमार्फत निवेदन

प्रतिनिधी २३ जुलै



**झरी-जामणी** : नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला झरी-जामणी तालुका काँग्रेस कमिटीने जाहीर पाठिंबा दिला आहे. या संदर्भात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना तहसीलदारांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप उर्फ लक्ष्मण भाऊराव बुर्रेवार यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला झरी-जामणी तालुका काँग्रेस कमिटीचा संपूर्ण पाठिंबा असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन राष्ट्रपतींकडे तसेच संबंधित केंद्रीय मंत्रालयाकडे तातडीने पाठविण्यात यावे आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा, अशी विनंती प्रशासनाकडे करण्यात आली. यावेळी सुभाष कुडमेथे, गंगाधर आत्राम, राकेश गालेवार, जालेंद्र गोपेवार, सुरेंद्र गेडाम, गणेश बेलेकार, शरद येल्टीवार, कुंदन ठावरी, अकतयवार, दत्ता बडगेवार, पिसाराम आत्राम, जलपत किडमेथे, शिवदास पुरके, रामदास आत्राम, राजकुमार कुडमेथे, संदीप झुमणाके, कृष्णा कावडे, स्वप्नील जिद्देवार, नितीन बत्तुलवार, धीरज घोटेकार, ऋतिक लोणगडागे, सौरभ मोहितकर, पंकज आलम, संकेत निब्रड, श्रेयश ढवरे आणि समीर निब्रड यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी अधीक्षकांनी तात्काळ चौकशी करून कारवाई करावी

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश; शिवसेनेच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी २३ जुलै

**अमरावती** : अमरावती जिल्ह्यात निकृष्ट दर्जाच्या बोगस बियाणे उत्पादक कंपन्यांना परवाने देणे, संबंधित कंपन्यांचे बियाणे नमुने संकलित करून संमत करण्याच्या प्रक्रियेत झालेल्या कथित गैरप्रकारांबाबत शिवसेना जिल्हाप्रमुख अरुण पडोळे, युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर आणि युवासेना जिल्हा समन्वयक अक्षय पवार यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले होते. या निवेदनाची पालकमंत्र्यांनी गंभीर दखल घेत कृषी अधीक्षक, अमरावती यांना "त्वरित तपासून कारवाई करावी" असे हिरव्या शाईने स्पष्ट निर्देश दिले आहेत. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांना विकले जात असल्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

अनेक कंपन्यांना संशयास्पद पद्धतीने परवाने देण्यात आले असून संबंधित बियाण्यांचे नमुने संमत करण्याच्या प्रक्रियेतही गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे दोषी कंपन्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या गंभीर विषयाची दखल घेत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवेदनावर स्वतः हिरव्या पेनाने "त्वरित तपासून कारवाई करावी" असा शेरा मारत कृषी अधीक्षकांना तातडीने चौकशी करण्याचे आदेश दिले.

त्यामुळे या प्रकरणात प्रशासनाला तत्काळ कार्यवाही करावी लागणार असून दोषींवर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबवण्यासाठी शिवसेना सातत्याने पाठपुरावा करीत असून दोषींना शिक्षा मिळेपर्यंत हा लढा सुरू राहील. युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्या आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा, हीच या निवेदनामागील प्रमुख भूमिका असून प्रशासनाने वेळ न दवडता कारवाई करावी. युवासेना जिल्हा समन्वयक अक्षय पवार यांनीही या प्रकरणात संपूर्ण चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. भविष्यात अशा प्रकारची शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठीही प्रभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. पालकमंत्र्यांच्या या निर्देशामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, बोगस बियाणे प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शहरातील सराईत गुन्हेगारास MPDA कायदयान्वये केले स्थानबध्द

प्रतिनिधी २३ जुलै



**अमरावती:** : अमरावती शहरातील सराईत गुन्हेगार बादल किशोर लुंड वय 25 वर्ष रा. माया नगर, अमरावती यास MPDA कायदयान्वये केले स्थानबध्द करण्यात आले.

कुख्यात गुन्हेगार बादल किशोर लुंड वय 25 वर्ष रा. माया नगर, अमरावती हा सन 2020 पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये सक्रिय आहे. त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन राजापेठ आणि बडनेरा अमरावती शहर येथे जबरी चोरी करतांना ईच्छा पुर्वक दुखापत करणे, दुखापत करणे, बलादग्रहणाबद्दल शिक्षा, गैरकायदयाची मंडळी, बेकायदशीर जमाव जमवणे, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी, चोरी, साधी दुखापत करणे, फौजदारीपात्र धाकदपटबद्दल शिक्षा, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, लोकसेवकाने रितसर जारी केलेल्या आदेशाचे उल्लघंन करणे, गुन्हयाचा सामाईक इरादा, हमला करणे, गैरपणे अटकाव करणे, अवैध्य शस्त्र बाळगणे, हद्दपार आदेशाचे आणि अधिसुचनांचे उल्लघंन करणे, दारूबंदी कायदा, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण 12 गुन्हे दाखल आहे. त्याचेवर यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेले आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले आहे तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सकीय आहे.

नमुद ईसमाविरूध्द व पोनि संदिप चव्हाण, पोलीस ठाणे राजापेठ, अमरावती शहर. यांनी सपोआ. संजय खताळे, राजापेठ विभाग व पोलीस उपायुक्त परीमंडळ-2, शाम घुगे, यांचे मार्फतीने पाठविलेल्या प्रस्तावाची पोलीस उपायुक्त, (मुख्यालय), श्रीमती प्राजंली सोनवणे, सपोआ गुन्हे कैलाश पुंडकर आणि पोलीस निरीक्षकअतुलवर, गुन्हेशाखायांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एम.पी.डी.ए. सेल चे अधिकारी सपोनि इम्रान नायकवडे, पोउपनि. अजय मिश्रा, पोलीस अंमलदार, चेतन कराडे तसेच पो.स्टे. राजापेठ येथील पोहेकॉ पंकज यादव व डी.बी. पथक यांनी पुर्तता केली. सदर प्रस्तावावर पोलीस आयुक्त, राकेश ओला यांनी आज दिनांक 22/07/2026 रोजी आदेश पारीत केले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संदिप चव्हाण, पो.स्टे. राजापेठ मार्फत आदेश तामिल करून त्यास स्थानबध्दतेच्या कालावधीकरीता मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दिनांक 22/07/2026 ला दाखल करण्यात आले आहे.

# जंतर मंतर येथील आंदोलनावर झालेल्या लाठी चार्जच्या निषेधार्थ इर्विन चौक येथे निदर्शने

प्रतिनिधी २३ जुलै

**अमरावती** : नीट परीक्षा गोंधळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी शांततामय मार्गाने लोकशाही चौकटीत जंतर मंतर, दिल्ली या ठिकाणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर भाजपच्या केंद्र सरकारच्या वतीने पोलिसांमार्फत अमानुष चार्ज करण्यातआला.

तरुण विद्यार्थी व विद्यार्थिनींना रक्तबंबाळ करेपर्यंत मारण्यात आले. मुलींना पाशवी पद्धतीने मारहाण करण्यात आली. केंद्र सरकारच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या पोलिसांची ही कृती अत्यंत निंदनीय आहे. अशा पार्श्वभूमीवर शांततामय आंदोलनावर अशा प्रकारे लाठीहल्ला करणारे पोलीस व त्यांचे बोलविते धनी असलेल्या केंद्र सरकारच्या निषेधार्थ डाव्या आघाड़ी च्या वतीने राज्यभर 23 जुलै 2026 रोजी तीव्र निदर्शने करण्याची हाक दिली आहे. याचाच भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक, इर्विन चौक येथे दु 2 वाजता निदर्शने आयोजीत केली आहे.

विविध जनसंघटनांना व जनतेला बरोबर घेऊन तसेच सर्व धर्मनिरपेक्ष संघटनांना बरोबर घेऊन राज्यभर ही निदर्शने होणार आहेत. केंद्र सरकारने यापुढील सर्व परीक्षा पारदर्शक होतील व नीट परीक्षेबाबत आणि इतरही अनेक परीक्षांबाबत झाले त्या प्रकारे पेपर लीक व घोटाळे होणार नाहीत यासाठी धोरण बदल करून ठोस काळजी घ्यावी. या संपूर्ण प्रकरणाला जबाबदार धरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची या पदावरून हकालपट्टी करावी व अमानुष लाठीचार्ज केल्याबद्दल विद्यार्थ्यांची व तमाम देशवासीयांची सरकारने माफी मागावी या मागण्यांसाठी ही निदर्शने करण्यात येत आहेत. या निदर्शनात विद्यार्थी, सर्व सामान्य जनतेने सहभागी होन्याचे आवाहन कॉ अशोक सोनारकर भाकपा, कॉ सुभाष पांडे माकपा, कॉ रमेश सोनूले माकपा, कॉ सुनिल मेटकर भाकपा, कॉ ओमप्रकाश कुटेमाटे, कॉ नीलकंठ ढोके भाकपा, कॉ राजेंद्र भांबोरे माकपा यानी केले आहे.

# SIR ची मुदत वाढली... पण ही शेवटची संधी समजा!

प्रतिनिधी २३ जुलै

**अमरावती:** : ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रत्येक मतदाराने आपली SIR प्रक्रिया पूर्ण करावी. "BLO माझ्या घरी येतील, तेव्हाच फॉर्म भरेन..." असा विचार करू नका; नाहीतर नंतर स्वतःलाच सरकारी कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू शकतात. महाराष्ट्रातील सर्व मतदारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना. भारत निवडणूक आयोगाने Special Intensive Revision (SIR) प्रक्रियेची मुदत वाढवून आता ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत केली आहे. अनेक नागरिकांना ही दिलासादायक बातमी वाटत असली, तरी ही मुदत वाढ म्हणजे काम पुढे ढकलण्याची संधी नाही. उलट, ही प्रत्येक मतदारासाठी शेवटची जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे. आजही अनेक नागरिक असे म्हणताना दिसतात – "BLO माझ्या घरी आले नाहीत... ते आले की फॉर्म भरेन...", "अजून वेळ आहे...", "नंतर पाहू...". पण असा विचार पुढे मोठी अडचण निर्माण करू शकतो. सर्वप्रथम एक गोष्ट समजून घ्या. BLO (Booth Level Officer) हा फक्त तुमच्या घरासाठी नियुक्त केलेला अधिकारी नसतो. त्याच्यावर संपूर्ण मतदान केंद्रातील शेकडो किंवा हजारो मतदारांची जबाबदारी असते. त्यांना घरभेटी द्यायच्या असतात, फॉर्म वाटायचे असतात, भरलेले फॉर्म स्वीकारायचे असतात, कागदपत्रांची पडताळणी करायची असते, माहिती ऑनलाइन अपलोड करायची असते आणि निवडणूक आयोगाने दिलेली अनेक कामे वेळेत पूर्ण करायची असतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराच्या घरी वेळेवर पोहोचणे नेहमीच शक्य होईल, अशी अपेक्षा ठेवणे वास्तववादी नाही. म्हणूनच "BLO माझ्या घरी आले नाहीत म्हणून मी फॉर्म भरला नाही" हे कारण पुढे तुमच्याच अडचणीचे ठरू शकते. तुम्ही स्वतः पुढाकार घ्या. आपल्या BLO शी संपर्क साधा. अधिकृत शिबिरात जा. आवश्यक माहिती घ्या. फॉर्म भरून प्रक्रिया पूर्ण करा. कोणता फॉर्म भरायचा, कोणती कागदपत्रे लागतील, तुमच्या बाबतीत काय आवश्यक आहे, हे विचारून खात्री करून घ्या. शेवटच्या काही दिवसांत काय होते, हे आपण अनेक सरकारी कामांमध्ये पाहिले आहे. मोठी गर्दी होते.

रांगा लागतात. काही कागदपत्रे अपूर्ण राहतात. पुन्हा दुरुस्ती करावी लागते. एखादी माहिती चुकीची भरली तर परत कार्यालयात जावे लागते. त्यामुळे शेवटच्या दिवसाची वाट पाहणे टाळा. अनेक नागरिकांना अजूनही वाटते की "माझे नाव आधीपासून मतदार यादीत आहे, मग मला काही करायची गरज नाही." अशा शंका असतील तर त्या मनात ठेवू नका. थेट BLO किंवा अधिकृत केंद्रात जाऊन विचारणा करा. आपल्या नावाबाबत काय प्रक्रिया आवश्यक आहे, याची खात्री करून घ्या. आज एक गोष्ट लक्षात ठेवण्याची गरज आहे. लोकशाही फक्त मतदानाच्या दिवशी मजबूत होत नाही; तर मतदार म्हणून आपली नोंद योग्य ठेवण्यापासून ती सुरू होते. म्हणून ही माहिती फक्त स्वतःपुरती ठेवू नका. आपल्या कुटुंबीयांना, शेजाऱ्यांना, मित्रांना, नातेवाईकांना आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना नक्की सांगा. अनेकांना आजही या प्रक्रियेची पूर्ण माहिती नाही. तुमच्या एका फोनमुळे, एका संदेशामुळे किंवा एका शेअरमुळे एखाद्या व्यक्तीला योग्य वेळी माहिती मिळू शकते. लक्षात ठेवा.

आजचा थोडासा वेळ उद्याचे मोठे हेलपाटे वाचवू शकतो. आजची जागरूकता उद्याचा मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवू शकते. ८ ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत समजून आजच आवश्यक प्रक्रिया पूर्ण करा. "उद्या करू" असे म्हणता म्हणता वेळ निघून जाऊ नये. मतदान हा केवळ अधिकार नाही, तर

# जिल्हाधिकारी कार्यालयात अजित पवार यांना अभिवादन



प्रतिनिधी २३ जुलै

**अमरावती** : : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून आदरांजली वाहिली.

# मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी विशेष मोहीम

## गणनापत्रक भरून देण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

प्रतिनिधी २३ जुलै

**अमरावती** : भारत निवडणूक आयोगामार्फत मतदारयादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पूर्णपणे नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे. मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी दि. 24 ते 26 जुलैदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी मतदानकेंद्रावर जाऊन गणनापत्रक भरून द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

मतदारांनी गणनापत्रक भरून दिले नसल्यास त्यांची नावे आगामी प्रारूप मतदारयादीमधून वगळल्या जातील. त्यामुळे मतदारांनी वेळेत हे पत्रक जमा करणे आवश्यक आहे. उर्वरित मतदारांचे नाव मतदारयादीत यावे, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष मोहीम राबवली जात आहे. शुक्रवार, दि. 24 जुलै ते रविवार, दि. 26 जुलै दरम्यान दररोज सकाळी 8 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत सर्व संबंधित विधानसभा मतदान केंद्रे ही विशेष मोहिम राबविली जाणार आहे. त्यामुळे मतदारांनी गेल्या 2024 मधील विधानसभा निवडणुकीत ज्या केंद्रावर मतदान केले आहे, त्याच ठिकाणी उपस्थित राहावे लागणार आहे. उपस्थित बीएलओकडून गणनापत्रक प्राप्त करून घ्यावे, तसेच सदर अर्ज पूर्ण भरून बीएलओकडे त्वरित जमा करावे. यामुळे मतदार यादीत मतदारांचे नाव समाविष्ट होण्यापासून कोणीही वंचित राहणार नाही. जिल्ह्यातील एकूण 25 लाख मतदारांपैकी सुमारे 16 लाख मतदारांनी आपले गणनापत्रक भरून दिले आहे. उर्वरीत 9 लाख मतदारांनी संबंधित 'बीएलओ' यांच्याकडे गणनापत्रक जमा केलेले नाही. त्यामुळे मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवणे आणि एकही मतदार वगळला जाऊ नये, यासाठी सर्व मतदारांनी तातडीने गणनापत्रक भरून देऊन या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

# मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रमाचे सुधारीत वेळापत्रक जाहीर

## अंतिम यादी 19 ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

प्रतिनिधी २३ जुलै

**अमरावती** : अमरावती: पावसामुळे मतदार केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या घरोघरी भेटी व गणना कार्यात अडथळे निर्माण झाले आहेत. नागरिकांची व प्रशासकीय यंत्रणेची गैरसोय टाळण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील विशेष सखोल पुनरीक्षण 2026 चे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार आता अंतिम यादी दि. 19 ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी हे सुधारित वेळापत्रक जाहिर केले आहे. दि. 1 ऑक्टोबर 2026 या अर्हता दिनांकावर आधारीत ही सुधारीत मतदारयादी तयार करण्यात येत आहे. यात 30 जून ते 8 ऑगस्ट दरम्यान बीएलओमार्फत घरोघरी भेटी, 8 ऑगस्टपर्यंत मतदानकेंद्रांचे सुसूत्रीकरण, पुनर्रचना, 17 ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी, 17 ऑगस्ट ते 16 सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहे. 17 ऑगस्ट ते 15 ऑक्टोबरपर्यंत नोटीस कालावधी, दावे व हरकती निकालात काढण्यात येणार आहे. 19 ऑक्टोबर, 2026 रोजी मतदारयादीची अंतिम प्रसिद्धी होणार आहे. मतदार यादीतील दुबार नावे वगळणे, मयत व्यक्तींची नावे कमी करणे आणि नवीन पात्र मतदारांचा समावेश करून अचूक व पारदर्शक मतदारयादी तयार करण्यासाठी ही मोहिम राबविण्यात येणार आहे. सर्व मतदारांनी बीएलओकडे विहीत नमुन्यातील गणना अर्ज मुदतीत सादर करावा. तसेच दि. 17 ऑगस्ट रोजी प्रारूपयादी प्रसिद्ध झाल्यावर आपले नाव तपासून घ्यावे आणि दावे किंवा हरकती असल्यास दि. 16 सप्टेंबर 2026 पर्यंत दाखल करावे.

# निवृत्तीवेतनधारकांसाठी 'महा-उपलब्धी' ॲप सुविधांचे माहेरघर

**अमरावती** : राज्य शासनाच्या सेवेतील सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी असलेले महा-उपलब्धी हे ॲप माहिती आणि सुविधांचे माहेरघर सिद्ध होत आहे. या मोबाईल ॲपची माहिती, तसेच पेंशनधारकांच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात पेन्शन अदालत पार पडली.

यावेळी सहाय्यक संचालक दीपक भिलपवार, सहाय्यक संचालक प्रल्हाद तुमने, अप्पर कोषागार अधिकारी जयश्री उताणे, वीरेंद्र दीक्षित प्रमुख उपस्थित होते. निवृत्तीवेतन कोषागार अधिकारी अमोल इखे यांनी, 'महा-उपलब्धी' ॲपमुळे निवृत्तीवेतनधारकांना दरमहाची पेमेंट हिस्ट्री, इन्कम सर्टिफिकेट, फॉर्म-१६, ई-पीपीओ लायब्ररी, ह्यातीचा दाखला आणि निवृत्तीवेतनविषयक शासन निर्णय आदी सुविधा उपलब्ध होत आहे. वरिष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांनी जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या मोबाईल ॲपचा उपयोग करण्याचे आवाहन केले. कनिष्ठ लेखापाल लुकेश मोहोरे व आदित्य सुरजुसे यांनी लाइव्ह प्रोजेक्टरद्वारे 'महा-उपलब्धी' ॲपमधील डिजिटल सेवांचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच लेखालिपिक कोमल गोसावी यांनी निवृत्तीवेतनधारकांचे मोबाईल क्रमांक निवृत्तीवेतन वाहिनीवर अद्यावत करण्यासाठी 'महाकोष' पोर्टलवर स्वतःचे लॉगिन करून मोबाईल क्रमांक अपडेट करण्याविषयी माहिती देणारा व्हिडिओ सादर केला. पेंशन अदालतीमध्ये उपस्थित निवृत्तीवेतनधारकांच्या समस्या व तक्रारींचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निरसन केले. अनेक क्लिष्ट प्रकरणांवर जागेवरच सकारात्मक निर्णय घेऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा देण्यात आला. कनिष्ठ लेखापाल नयना सोलव यांनी प्रास्ताविकातून निवृत्तीवेतनाबाबत शासन निर्णय आणि इतर सुविधांबाबत कोषागार कार्यालयाची भूमिका विषद केली.

# शबरी महामंडळाच्या महाव्यवस्थापकांची आमझरी, खटकालीला भेट

**अमरावती:** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिकतर्फे राज्यातील 25 गावांमध्ये आदि ग्राम पर्यटन योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील आमझरी आणि खटकाली (ता. चिखलदरा) दोन गावाची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही गावांना शबरी महामंडळ महाव्यवस्थापक जयरेखा निकुंभ यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान होमस्टे लाभार्थ्यांशी संवाद साधून योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. तसेच मध्यप्रदेशातील अभ्यास दौऱ्यास भेट दिलेल्या लाभार्थ्यांकडून त्यांच्या अनुभवाची माहिती जाणून घेण्यात आली.

# शेकडो नागरिकांची नेत्रतपासणी; मोफत चष्म्यांचे वाटप

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रविण पोटे पाटील यांचा लोकोपयोगी उपक्रम

प्रतिनिधी २३ जुलै



**अमरावती** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या वतीने आयोजित 'सेवा दशक अभियान अंतर्गत आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोफत नेत्रतपासणी व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेकडो नागरिकांची तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून अत्याधुनिक यंत्रांच्या साहाय्याने नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांना त्यांच्या क्रमांकाचे मोफत चष्मे वितरित करण्यात आले. तसेच नेत्र आरोग्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. चष्मे मिळाल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. यावेळी आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्यासह महापौर श्रीचंद तेजवानी, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, सभागृह नेते चेतन गावंडे, महिला मोर्चा अध्यक्षा सुधा तिवारी, चेतन पवार, लवीना हर्षे, बरखा बोज्जे, कौशिक अग्रवाल, मंगेश खोंडे, सारिका तिवारी, प्रीती मकवाना, गंगा खारकर, प्रीती दुबे शीतल वाघमारे रवींद्र खांडेकर, नितीन गुडधे, ॲड. प्रशांत देशपांडे, मिलिंद बांबल, सतीश करेशिया, संजय कटारिया, सुरेंद्र बुरंगे, विक्की शर्मा, राजेश पड्डा, लखन राज यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती शहर व जिल्ह्यात सेवा दशक अंतर्गत रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, अन्नदान, वारकऱ्यांना सन्मान व जेवण तसेच विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पुढील काही दिवस हे उपक्रम सुरू राहणार आहेत.

# रस्त्यांवरील खड्डे, डबक्यांमुळे वाहतुकीला अडथळे!

प्रतिनिधी २३ जुलै

**खामगाव:** शहरातील अत्यंत वर्दळीचा टिळक पुतळा ते केडिया टर्निंगदरम्यानचा प्रमुख रस्ता गेल्या अनेक महिन्यांपासून अर्धवट असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावर काही ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.



खड्डयांमध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे डबके तयार होत असून, त्यामुळे रस्त्याची वास्तविक अवस्था लक्षात येत नाही. परिणामी, वाहनचालकांना योग्य अंदाज न आल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. दररोज या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने वाहनांची गती मंदावते आणि वाहतूककोंडीची समस्या निर्माण होते. शाळकरी विद्यार्थी, कामगार, तसेच व्यापारी वर्गालाही या समस्येमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या, तरी त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

### अपघाताचा धोका

रस्त्यावर पडलेल्या खोल खड्डयांमुळे वाहनांचे संतुलन बिघडून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः पावसाळ्यात पाण्याने भरलेले खड्डे नजरेस न पडल्याने दुचाकीस्वारांना गंभीर इजा होण्याचा धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी लहान-मोठे अपघात झाल्याची माहितीही नागरिकांकडून मिळत आहे.

### डबक्यांमुळे वादाचे प्रसंग !

खामगावात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमध्ये पाणी साचून ठिकठिकाणी डबके निर्माण झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. या डबक्यांतून वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे पायी जाणाऱ्या नागरिकांच्या अंगावर चिखलमिश्रित पाणी उडत आहे. यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, काही ठिकाणी वाहनचालक आणि पादचारी यांच्यात वादाचे प्रसंगही उद्भवत आहेत.

# शेतजमिनीच्या वादातून माय-लेकींवर प्राणघातक हल्ला!

## खडकी शिवारातील घटना : तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २३ जुलै

**मलकापूर:** तालुक्यातील खडकी शिवारात शेतजमिनीच्या जुन्या वादातून एका महिलेसह तिच्या दोन मुलींवर विळ्याने हल्ला करून मारहाण केल्याची घटना २१ जुलै रोजी सकाळी घडली. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार कल्पना अनंता निंबाळकर (३६, रा. क्रांती कॉलनी, बोदवड, जि. जळगाव) यांच्या पतीने जून २०२५ मध्ये खडकी शिवारातील गट क्रमांक १७मधील दोन एकर शेतजमीन खरेदी केली होती. ही जमीन आरोपींना घ्यायची होती. मात्र, ती निंबाळकर कुटुंबाला विकण्यात आल्याने



आरोपींकडून राग धरल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. २१ जुलै रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास कल्पना निंबाळकर या मुली भाग्यश्री (१८) व रीना (१३) यांच्यासह शेतात काम करीत असताना आरोपी सुनीता विनोद निकम, तुषार विनोद निकम व लक्ष्मी विनोद निकम (सर्व रा. खडकी, ता. मलकापूर) तेथे आले. 'हे शेत आमचे आहे, तुम्ही येथे काय करता?' असे म्हणत त्यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली. तक्रारीनुसार, तुषार निकम याने हातातील विळ्याने कल्पना निंबाळकर यांच्या डाव्या हाताच्या बोटांवर वार करून त्यांना जखमी केले. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या दोन्ही मुलींनाही मारहाण करण्यात आली. घटनेचा व्हिडिओ चित्रीत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाग्यश्रीच्या हातातील मोबाइल दगडावर आपटून फोडण्यात आल्याचा तसेच कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी कल्पना निंबाळकर यांच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक सतीश दत्तात्रय महाल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# गिरड्यात धुमाकूळ घालणारी मादी बिबट अखेर जेरबंद !

प्रतिनिधी २३ जुलै

**बुलढाणा:** अजिंठा पर्वतरांगांतील गिरडा गावाच्या परिसरात सातत्याने वावरणारी मादी बिबट बुधवारी (दि. २२) सकाळी वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाली. गावातील दोन गोठ्यांमध्ये घुसून नऊ शेळ्या आणि एका वासराचा फडशा पाडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



ग्रामस्थांच्या मागणीनंतर वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याने निःश्वास सोडला. नागरिकांनी सुटकेचा बुलढाणा वन परिक्षेत्रातील गिरडा गावालगत दाट जंगल असून, या परिसरात बिबट्या, अस्वल आणि तरस यांसारख्या वन्य प्राण्यांचा वावर आहे. मागील काही दिवसांत मादी बिबट्याने गावातील दोन गोठ्यांवर हल्ला करून नऊ शेळ्या आणि एक वासरू ठार केले होते. या हल्ल्यांमुळे पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले, तसेच गावालगत बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेता ग्रामस्थांनी वन विभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मानव-वन्यजीव संघर्षाची शक्यता लक्षात घेऊन उपवनसंरक्षक जमीर मुनीर शेख यांनी गिरडा येथे भेट देत पाहणी केली. ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर गावाजवळ आमिष ठेवून पिंजरा लावण्यात आला. बुधवारी सकाळी त्यामध्ये मादी बिबट्या अडकल्याचे आढळून आले. माहिती मिळताच वनविभागाच्या बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेत बिबट्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले. त्यानंतर मादी बिबट्याला वैद्यकीय तपासणीसाठी बुलढाण्यातील राणीबाग येथे आणण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## खामगाव उपविभागात ६,५४८ लाभांचे वितरण; जिगाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ₹९.३५ कोटींच्या मोबदल्याचे वाटप

प्रतिनिधी २३ जुलै

**खामगाव:** महाराष्ट्र शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान" अंतर्गत खामगाव विधानसभा मतदारसंघातील महाराजस्व समाधान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात श्रीहरी लॉन्स, सुटाळा रोड, खामगाव येथे आयोजित करण्यात आले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या शिबिरास मा. नामदार ॲड. श्री. आकाश फुंडकर, मंत्री (कामगार), महाराष्ट्र राज्य यांची अध्यक्षीय उपस्थिती लाभली. जिल्हाधिकारी, बुलढाणा मा. डॉ. प्रविणकुमार देवरे (भा.प्र.से.) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय विभागांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिला. खामगाव उपविभागातील सुमारे दीड हजारांहून अधिक लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थिती लावली. उपविभागात एकूण ६,५४८ लाभांचे वितरण करण्यात आले.

महसूल विभागामार्फत विविध शैक्षणिक दाखले, विशेष सहाय्य योजनेअंतर्गत मंजुरी आदेश, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजनेअंतर्गत शेतरस्ता मंजुरीपत्रे, 'जिवंत सातबारा' मोहिमेअंतर्गत अद्ययावत ७/१२ उतारे तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ८५(२) नुसार आपसी वाटणीपत्रांवरील पारित आदेशांचे वितरण



करण्यात आले.

पुरवठा विभागामार्फत पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले.

जिगाव प्रकल्पांतर्गत मौजे भास्तन येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना ₹९ कोटी ३५ लाख इतक्या मोबदल्याचे धनादेश वितरित करण्यात आले.

नगर विकास विभाग व नगरपालिका, खामगाव यांच्या माध्यमातून पीएम स्वनिधी योजना, बचत गट कर्ज मंजुरी, दिव्यांग लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य तसेच फेरीवाल्यांना भाडेतत्त्वावरील दुकान गाळ्यांचे वाटप करण्यात आले.

कृषी विभागामार्फत जमीन आरोग्य पत्रिका, नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्पांतर्गत पूर्वसंमती पत्रे तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेची पूर्वसंमती पत्रे वितरित करण्यात आली.

ग्रामविकास विभाग व पंचायत समिती, खामगाव यांच्या वतीने व्हीबीजी/रोजगार साहित्य, वैयक्तिक शौचालय अनुदान, घरकुल मंजुरी, आयुष्मान भारत कार्ड यांचे वितरण करण्यात आले. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत विविध प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले.

भूमी अभिलेख विभागामार्फत स्वामित्व योजनेअंतर्गत सनदांचे वितरण करण्यात आले. महिला व बालविकास विभागामार्फत बेबी केअर किट तसेच लेक लाडकी योजनेअंतर्गत लाभांचे वितरण करण्यात आले. शालेय शिक्षण विभागामार्फत आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना लाभपत्रे प्रदान करण्यात आली. पशुसंवर्धन विभागामार्फत राजे यशवंतराव होळकर महामेष योजना तसेच पशुखाद्य कारखाना योजनेअंतर्गत लाभ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागामार्फत मूळ दस्त वाटप योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मूळ दस्त प्रदान करण्यात आले.

# वरखेडमध्ये घरासमोर दुचाकी जाळण्याचा प्रयत्न!

## मलकापूर ग्रामीण पोलिसांत अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २३ जुलै

**मलकापूर:** तालुक्यातील वरखेड येथे घरासमोर उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात व्यक्तीने पेटवून दिल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री घडली. या आगीत दुचाकीचे सुमारे १० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वरखेड येथील प्रकाश सुखदेव आगाशे (६५) यांनी मंगळवारी रात्री सुमारे ११ वाजता त्यांची दुचाकी (क्रमांक एम. एच.२८-एक्यू-३६८९) ही घरासमोरील रस्त्यावर उभी केली होती. त्यानंतर, कुटुंबीय झोपले असताना रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास आग लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कुटुंबीयांनी तत्काळ बाहेर धाव घेतली असता, दुचाकीला आग लागल्याचे दिसून आले. त्यांचा मुलगा गजानन आगाशे याने प्रसंगावधान राखून पाण्याच्या सहाय्याने आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत दुचाकीच्या मागील भागाचे मोठे नुकसान झाले होते. या प्रकरणी प्रकाश आगाशे यांच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे कृत्य जुन्या वादातून किंवा अन्य कारणातून जाणीवपूर्वक करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

# मलकापूर येथील पूर्णा नदीत बुडून वृद्धाचा मृत्यू

## नदीत स्नान करताना तोल गेल्याचा प्राथमिक अंदाज

प्रतिनिधी २३ जुलै

**मलकापुर:** तालुक्यातील धुपेश्वर येथील पूर्णा नदीच्या पात्रात पाण्यात बुडून एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. या - घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. सुशीलकुमार बाबूलालपोपट(६०,रा.कुलमखेड, ता. मलकापूर) हे सोमवारी पहाटे धुपेश्वर येथे देवदर्शनासाठी जात असल्याचे घरच्यांना सांगून निघाले होते. सकाळच्या सुमारास पूर्णा नदीच्या पात्रात - एका व्यक्तीचा मृतदेह तरंगताना आढळून आला. याबाबतची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी ठेवलेल्या शर्टाच्या खिशात सापडलेल्या आधारकार्डाच्या आधारे ओळख मृताची पटविण्यात आली. त्यानंतर मृताचे पुतणे संकेत अरुण ठक्कर यांनीघटनास्थळीजाऊनमृतदेहाची ओळख सुशीलकुमार अशी निश्चित केली. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, सुशीलकुमार हे धार्मिक प्रवृत्तीचे होतेआणिधुपेश्वरयेथेदेवदर्शनासाठी नियमितजातअसत.देवदर्शनापूर्वी नदीत स्नान करण्यासाठी उतरले असता तोल जाऊन त्यांचा पाण्यात बुडूनमृत्यूझालाअसावाअसाप्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे फिर्यादीने पोलिसांना दिलेल्यानिवेदनात्नमूदकेले.

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा सुधारीत कार्यक्रम जाहीर

प्रतिनिधी २३ जुलै

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. सुधारित कार्यक्रमानुसार, केंद्रस्तरीय मतदान अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीची मोहीम ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. १७ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नोटिसा देणे, सुनावणी घेणे आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया पार पडेल. यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# दोन दिवसात 384 अर्जाची विक्री; 31 नामांकन दाखल

## दि बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक निवडणूक

प्रतिनिधी २३ जुलै

**बुलढाणा :** सहकार क्षेत्रात अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या दि बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी हकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेला वेग आला असून, २० जुलैपासून नामांकन अर्ज भरण्याची सुरु झालेली प्रक्रिया २४ जुलैपर्यंत चालणार आहे. पहिल्या दोन दिवसात ३८४ अर्जाची विक्री झाली असून एकूण ३१ नामांकन अर्ज दाखल झाले आहे. बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी पहिलाच नामांकन अर्ज दाखल केला तो शिवसेना जिल्हाप्रमुख जालीधर आश्रुबा बुधवत यांनी ३ वेगवेगळ्या मतदार संघातून ३ अर्ज दाखल केले आहेत. तर त्यांच्याच सुविद्य पत्नी कमलाबाई जालीधर बुधवत यांनी दोन मतदार संघातून २ अर्ज दाखल केले आहेत. मलकापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार चैनसुख मदनलाल संचेती यांनी ४ मतदार संघातून अर्ज दाखल केले आहेत. तर चंद्रशेखर पुनमचंद संचेती यांनी दोन मतदार संघातून नामांकन भरले आहेत. बुलढाण्याचे माजी आमदार व भाजपाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या सुविज्ञ पत्नी अर्पिता विजयराज शिंदे यांनी दोन मतदार संघातून अर्ज दाखल केले आहेत. याशिवाय राष्ट्रवादीचे नेते संतोष साहेबराव रायपुरे, रियाजखान इलियास खान पठाण यांनी एका मतदार संघातून अर्ज दाखल केला आहे. याशिवाय अर्ज दाखल करणारे उमेदवार महादेव जगन्नाथ पाटील नांदुरा, अशोक सुगदेव हटकर खामगाव, ओम सारंगधर पाटेखेडे खामगाव, जयचंद्र भगवान राऊत मलकापूर, ज्ञानदेव पांडूरंग वाघुदे मलकापूर, प्रविण शांताराम क्षीरसागर, पुरुषोत्तम शिवाजी वायाळ चिखली, सुभाष लक्ष्मण पेसोडे खामगाव, समाधान दिनकराव शिंगणे चिखली, आशा राजू मुळे बुलढाणा, दिलीप हरिभाऊ नाफडे मोताळायांनीदोनमतदारसंघातून, अविनाश तुळशीराम मापारी नांदुरा, विशाल विलासराव पाटील नांदुरा तर डॉ. अरविंद वासुदेव कोलते मलकापूर यांनी प्रत्येकी एका एका मतदार संघात अर्ज दाखल केले आहेत. अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया शु. का. गारोळे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दि बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक मर्यादीत बुलढाणायांच्याकडेसुरुआहे.

# भर पावसातही रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## 30 रक्तदाते हजर, 25 जणांचे रक्तदान

प्रतिनिधी २३ जुलै

**खामगाव:** एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन आणि महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक कामगार संघटना_ यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष रुग्णसेवक सुरजभैय्या एस. यादव यांनी दिनांक 20 रोजी व्हाट्सअप ग्रुपवर केलेल्या आवाहनाला रक्तदात्यांनी तातडीने प्रतिसाद दिला आहे.

"एकनिष्ठा रक्तदाता महाराष्ट्र" या व्हाट्सअप ग्रुपद्वारे आतापर्यंत हजारो रुग्णांना एक नवीन संजीवनी मिळाली आहे. शासकीय रक्तपेढीमध्ये रक्ताचा भीषण तुटवडा असल्याने काल आणि परवा करण्यात आलेल्या आवाहनानंतर 30 रक्तदाते रक्तदानासाठी हजर झाले काही खाजगी मध्ये रक्तदाते यांनी रक्तदान केले.

त्यापैकी 25 रक्तदात्यांनी रक्तदान केले. काहींचे बीपी वाढल्याने, काही अनफिट असल्याने, तर काही औषधी घेत असल्यामुळे त्यांना तात्पुरते रिजेक्ट करण्यात आले. तरीही त्यांनी पुढील वेळी नक्की रक्तदान करू असे आश्वासन दिले.




संकलित करण्यात येणारे रक्त थैलेसिमिया ग्रस्त मुले, सिकेल सेल योद्धे, अपघातग्रस्त रुग्ण, प्रसूती झालेल्या माता आणि अनिमिया आजाराने ग्रस्त रुग्णांसाठी अत्यंत मोलाचे ठरणार आहे. याबत संस्थापक अध्यक्ष रुग्णसेवक सुरजभैय्या एस. यादव* म्हणाले,

"भर पावसाळ्यातही रक्तदाते घरातून बाहेर पडून रक्तदानासाठी आले. हीच खरी मानवतेची सेवा आहे. या ग्रुपच्या माध्यमातून आतापर्यंत 25 रुग्णांना थेट रक्त उपलब्ध करून दिले आहे. तुमच्या 15 मिनिटांमुळे अनेक कुटुंबांना नवीन जीवन मिळाले आहे. प्रत्येक रक्तदाता हा देवदूत आहे. सर्वांचे मनापासून आभार."

सहभागी 25 रक्तदात्यांची नावे:* 1. अनिरुद्ध पाटील 2. रुपेश कापडे 3. निलेश अंबाळकर 4. गोपाल सायखेडे 5. लक्ष्मण कंडारकर 6. ज्ञानेश्वर मुन्हेकर 7. सागर देशमुख 8. कुणाल कदम 9. सुनिल खंडारे 10. शुभम चाकोते 11. मंगेश केनेकर 12. शिवकुमार अटरावलकर 13. अर्जुन सोनोने 14. पवन शर्मा 15. श्रीकृष्ण मुन्हे 16. अमोल चौकसे 17. योगेश इंगळे 18. कृष्णा चव्हाण 19. गणेश जुमळे 20. अमर तेलंग 21. रवि वाकोडे 22. शे. अलिम शे. सत्तार 23. प्रज्योत उमाळे 23. शुभम शमी, यांच्यासह 24 गोपनीय रक्तदाता, 25 गोपनीय रक्तदाता यांनी शासकीय रक्तपेढी मध्ये रक्तदान केले. या रक्तसेवेत एकनिष्ठाचे सुरजभैय्या यादव, चेतन कदम, कविताताई पाटील, नारायण सैरीसे, सागर दाभाडे, मधुकर सोळंके, कु. तेजस्विनी देशमुख, घारोड सरपंच वैभव पाटील शासकीय रकतपेढीचे रक्तसंक्रमण अधिकारी सौ. प्रणाली देशमुख व टेक्निशियन अली सर, सौ. पाटील कर्मचारी राम अंभोरे, भारती काळे यांचे सहकार्य लाभले अशी माहिती गोपाल सायखेडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. "एक रक्तदाता = तीन जीवनदाता" हा संदेश देत अधिकाधिक युवकांनी रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक कामगार संघटने तर्फे सुरजभैय्या यादव यांच्या वतीने करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com




















# 'महाराष्ट्र बंद'च्या पार्श्वभूमीवर अकोल्यात पोलिसांचा कडक पहारा

प्रतिनिधी २३ जुलै

**अकोला :** वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या 'महाराष्ट्र बंद'च्या पार्श्वभूमीवर अकोला शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अकोला पोलीस दल पूर्णपणे 'ॲक्शन मोड'मध्ये आले आहे. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि बंद शांततेत पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासनाकडून शहरात तगडा आणि कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अकोला शहरातील अत्यंत संवेदनशील भाग, मुख्य बाजारपेठा, बस स्थानक, रेल्वे स्टेशन आणि प्रमुख चौकांमध्ये सकाळपासूनच पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला आहे. ठिकठिकाणी पोलिसांच्या गाड्या, दंगा नियंत्रण पथक तैनात करण्यात आल्या आहेत. संशयित वाहनांची आणि नागरिकांची कसून चौकशी केली जात आहे. बंददरम्यान कुठेही अनुचित प्रकार किंवा हिंसाचार होऊ नये, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विशेष गस्त घातली जात आहे. महत्त्वाच्या आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांनी स्वतः मोर्चा सांभाळला असून, परिस्थितीवर सूक्ष्म लक्ष ठेवले जात आहे. पोलीस प्रशासनाने बंद काळात नागरिकांना व आंदोलकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. नियम मोडून कायदा हातात घेणाऱ्यांवर किंवा हुल्लडबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. अकोला पोलिसांच्या या आक्रमक आणि कडक बंदोबस्तामुळे बंदच्या काळात शहरातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे दिसून येत असून, दोन तीन घटना वगळता कुठेही अनुचित प्रकार न घडता शांतता प्रस्थापित झाली आहे.



## शाळा बंद, विद्यार्थ्यांना सोडले घरी!

प्रतिनिधी २३ जुलै

**अकोला :** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या 'महाराष्ट्र बंद'चा जोरदार प्रभाव आज अकोला शहरासह जिल्हाभरात पाहायला मिळाला. या बंदच्या आवाहनाला अकोलेकरांनी व्यापक पाठिंबा दर्शवला असून, सकाळच्या सत्रापासूनच शहरातील शाळा आणि महाविद्यालयांवर याचा थेट परिणाम दिसून आला. कोचिंग क्लासेस देखील बंद होते. त्यामुळे शहरात कोचिंग एरियामध्ये शुकशुकाट होता.

अकोला शहरातील बहुतांश शाळा आज सकाळपासूनच पूर्णपणे बंद होत्या. ज्या शाळा सकाळी नेहमीप्रमाणे भरल्या होत्या, तेथेही विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यंत नगण्य होती. बंदचे गांभीर्य आणि संभाव्य गैरसोय लक्षात घेता, अनेक शाळा प्रशासनांनी सकाळीच विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे घरी सोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सकाळी ८-९ वाजेच्या सुमारास रस्त्यांवर विद्यार्थ्यांची घरी परतण्यासाठी एकच धावपळ पाहायला मिळाली. शाळांबरोबरच शहरातील प्रमुख महाविद्यालयांमध्येही आज शुकशुकाट पसरला होता. पालकांनी सुरक्षेचा उपाय म्हणून पाल्यांना शाळेत पाठवणे टाळल्याने वर्गांमध्ये शून्याच्या बरोबरीने उपस्थिती होती.

एकीकडे शहरात बंदचे सावट असताना काही मोजक्या शाळांनी मात्र आपले नेहमीचे कामकाज सुरु ठेवले होते. मात्र, विद्यार्थ्यांअभावी या शाळांमध्येही शुकशुकाटच पाहायला मिळाला. परिस्थितीचे गांभीर्य पाहून या शाळांनाही अखेर दुपारच्या आतच शैक्षणिक कामकाज गुंडाळावे लागले.

## महापालिकेसमोर मोर्चा धडकला!

**अकोला :**

बंदच्या दरम्यान वंचित बहुजन आघाडीसोबत महाविकास आघाडीतील विविध पक्ष आणि संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. गांधी चौकात मोर्चा पोहोचताच व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली. यानंतर मोर्चा अकोला महापालिकेसमोर पोहोचताच शिवसैनिकांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. 'ये सरकार निकम्मी है' अशा जोरदार घोषणा देत मोर्चेकऱ्यांनी महापालिकेचा परिसर ढवळून काढला आहे.

अकोल्यात 'महाराष्ट्र बंद'च्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या बंदच्या हाकेला विविध राजकीय पक्ष आणि संघटनांनी पाठिंबा देत थेट रस्त्यावर धडक दिली. मोर्चा शहराच्या प्रमुख मार्गांवरून जात गांधी चौकात पोहोचला. तेथे आंदोलकांनी बंदची कडक हाक देताच सुरु असलेली दुकाने टप्प्याटप्प्याने बंद करण्यात आली. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे व्यापाऱ्यांनी तातडीने शटर खाली खेचले.

गांधी चौकातून पुढे निघालेला मोर्चा अकोला महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर धडकला. या ठिकाणी शिवसैनिकांनी अतिशय आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला आणि सरकारला धारेवर धरले. 'ये सरकार निकम्मी है, जो सरकार निकम्मी है वो सरकार बदलनी है!' अशा कडक घोषणा देत आंदोलकांनी महापालिका परिसर दणाणून सोडला.

## दाना बाजारात दुकानांची तोडफोड

प्रतिनिधी २३ जुलै

**अकोला :** बंददरम्यान अकोल्यातील प्रसिद्ध दाना बाजारात दुकानांची तोडफोड झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे दाना बाजारातील व्यापारी अत्यंत संतप्त झाले असून त्यांनी घटनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. 'शहरभरात तगडा बंदोबस्त असताना तोडफोड घडलीच कशी आणि पोलीस कुठे होते?' असा थेट सवाल व्यापाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

अकोल्यातील बंद आंदोलनाला दाना बाजारात हिंसक वळण लागल्याचे समोर आले आहे. शहरातील मुख्य धान्य बाजारपेठ असलेल्या दाना बाजारात काही उपद्रवी तत्त्वांनी दुकानांची तोडफोड केल्याचा गंभीर आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. या प्रकारामुळे संपूर्ण बाजारपेठेत तीव्र संतापाची लाट उसळली आहे.




तोडफोडीची बातमी पसरताच दाना बाजारातील व्यापाऱ्यांनी एकत्र येत या हिंसक कृत्याचा कडक शब्दांत निषेध केला. उघडी असलेली किंवा बंद असलेली दुकाने लक्ष्य करून नुकसान पोहोचवल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला असून, यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. शहरभरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात असल्याचा दावा केला जात असताना दाना बाजारात ही घटना घडल्याने व्यापाऱ्यांनी पोलीस प्रशासनाच्या कामगिरीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. 'घटना घडत असताना पोलीस पथक कुठे होते?' असा संतप्त सवाल विचारत, तोडफोड करणाऱ्या गुन्हेगारांवर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दाना बाजारात धाव घेतली असून, तोडफोड करणाऱ्यांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

## न्यू क्लॉथ मार्केटमध्ये तुफान राडा

### व्यापारी आणि आंदोलकांमध्ये वादावादी !



प्रतिनिधी २३ जुलै

**अकोला :** वंचित बहुजन आघाडीच्या 'महाराष्ट्र बंद'दरम्यान अकोल्यातील प्रसिद्ध न्यू क्लॉथ मार्केटमध्ये मोठा गोंधळ उडाला आहे. दुकाने बंद करण्याच्या मुद्द्यावरून आंदोलक आणि स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. परिस्थिती तापत असल्याचे पाहून पोलिसांनी तातडीने घटनास्थळी हस्तक्षेप करत वाद मिटवला आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.

बंदच्या पार्श्वभूमीवर वंचितचे आंदोलक न्यू क्लॉथ मार्केट परिसरातील उघडी असलेली दुकाने बंद करण्याचे आवाहन करत होते. या वेळी काही व्यापाऱ्यांनी दुकान बंद करण्यास विरोध दर्शवल्याने आंदोलक आणि व्यापाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. पाहता पाहता या वादाचे रूपांतर मोठ्या गोंधळात झाले. बाजारात गोंधळ निर्माण होताच तैनात असलेल्या पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मध्यस्थी करत आंदोलक आणि व्यापाऱ्यांना शांत केले. पोलिसांनी दाखवलेल्या प्रसंगावधाणामुळे पुढील मोठा अनर्थ टळला असून सध्या या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## शहरात तणावपूर्ण शांतता!

प्रतिनिधी २३ जुलै

**अकोला :** गुरूवारी सकाळपासूनच चौका-चौकात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने एकप्रकारचा तणावपूर्ण वातावरण पहावयास मिळत होते. त्यातच शाळा बंद असल्याने सकाळी तयारी करून शाळेला गेलेले विद्यार्थी परत आल्याने पालकही आश्चर्य व्यक्त करीत होते.

वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिल्याने सर्वच दुकाने बंद करण्यात आली होती. काही तुरळक दुकाने चालू असली तरी वंचितने बाइक रॅली काढून ही दुकाने बंद करण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे शहरातील व्यावसायिक आपली प्रतिष्ठाने बंद करून दुकानासमोरच उभे होते.

शहरातील दुकाने बंद असली तरी नागरिकांची ये-जा सामान्यपणे सुरू होती. अशाप्रकारे शहरात दुपारी दोन वाजेपर्यंत तणावपूर्ण शांतता पसरलेली दिसून आली. या काळात पोलिसांनी खडा पहारा देत बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी दक्षता बाळगलेली दिसून आली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135